# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शुक्रवार । दि. २१ ऑगस्ट २०२६ । अंक ७६ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## ‘सुटे खाद्यतेल विकल्यास कारवाई’

**मुंबई :** दूध, पनीर आणि अन्य खाद्यपदार्थांमधील भेसळीविरोधात कारवाई केल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी खाद्यतेलाकडे मोर्चा वळवला आहे. खाद्यतेलाच्या दर्जाबाबत कठोर तपासणी सुरू करण्यात आली असून, अनधिकृत मिश्रण, मुदत संपलेल्या तेलाचे पुन्हा पॅकिंग आणि सुटे तेल विक्री करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. नियमांनुसार सात वर्षांपासून जन्मठेपेपर्यंत शिक्षा आणि भेसळप्रकरणी दहा लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होण्याची शक्यता आहे.

## रायगडात सर्वसाधारण पाऊस

**पुणे :** जुलै महिन्यात राज्यभर झालेल्या दमदार पावसानंतर ऑगस्टच्या पहिल्या तीन आठवड्यांत पावसाने मोठी ओढ दिल्याने राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये अपुऱ्या पावसाचे सावट निर्माण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील परिस्थिती चिंताजनक असून, ऑगस्टअखेरपर्यंत मोठ्या पावसाची शक्यता नसल्याने खरीप पिकांसह पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. रायगड जिल्ह्यात आतापर्यंत सर्वसाधारण पाऊस नोंदविण्यात आला आहे. एक जून ते १९ ऑगस्टदरम्यान कोकण-गोव्यात सरासरीपेक्षा चार टक्के कमी पाऊस नोंदविण्यात आला आहे.





हिरो शोरूमच्या शेजारी, बायपास रोड, चेंधरे, अलिबाग | फोन नं.: ८००७१२३१७४/८००७१२३१७६

विले पार्ले (पू) । ठाणे (प) । कल्याण (प) । बोरिवली (प) । पनवेल (प) । डोंबिवली (पू) । वाशी । घोडबंदर रोड (ठाणे) । भांडुप (प) । गोरेगाव (प) । विरार (प) । दादर (प) । उरण

टोल फ्री नं: १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com । info@pngadgil.com

INDIA । USA

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२१ ऑगस्ट

१) श्री.दत्ताराम नारायण कोळी नवेदर नवगाव, अलिबाग, दि.२१-८-१९४९

२)श्री.लालसिंग शिवबालक कश्यप मु.राजमळा, अलिबाग, दि.२१-८-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कनिष्का सौरभ घरत, वाढदिवस, तुलाडदेवी, चौल, अलिबाग**

## गुणवंतांचा पुरस्काराने होणार सन्मान

**चिरनेर :** उरण तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा आठवा वर्धापन दिन रविवार दि.२३ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने शिक्षण क्षेत्रासह विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या वशेणी गावातील व्यक्तिमत्त्वांना जनसेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छिंद्र म्हात्रे यांनी दिली. पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व भेटवस्तू असे असणार आहे. हा कार्यक्रम राजिप प्राथमिक शाळेतील स्व.जगन्नाथ मरू म्हात्रे येथील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की, आमच्या ग्राहकांनी, शेतजमीन मिळकतीचे मालक भूमी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री. राकेश उर्फ बंडू काशिनाथ राठोड यांच्याकडून शेतजमिन मिळकती खरेदी करण्यास दर्शविली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजे- तुकसई, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड, वर्ग-१**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| २ अ | ००-२३-५० | खाता क्र. १५७ | २.६५ |
| २ब | ००-२३-०० | खाता क्र. ४४ व १५७ | २.६५ |
| २अ | ००-८३-०० | खाता क्र. १५७ | ०.५५ |
| २ब | ००-८३-०० | खाता क्र. ४४ व १५७ | ०.५५ |
| | एकूण २१२ गुंठे | | |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमुद केलेल्या शेतजमीन विक्री, विनिमय, तारण भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएम्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतचे कागदपत्रे सादर करुन या सूचनेच्या प्रकाशनापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंटवरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

**Mr. Vishal Singh**
**For M/s V R legal & Co**
कार्यालय क्र. २२५, थापर कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र. ५१, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर
नवी मुंबई, संपर्क :+ ९१-९९२०३९०९५९
ईमेल आयडी :- adv.vrlegal@gmail.com

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम )**
सादर सेवा

**ई-लिलाव अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे द्वारे खालील वेळापत्रकानुसार आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर प्रकाशित करण्यात आलेल्या व्यावसायिक करारांच्या ई-लिलावाची घोषणा करण्यात आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची संख्या / लॉट | ई-लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|
| 1 | रेल्वे गाड्यांच्या आतील भागात जाहिरातींचे प्रदर्शन - मडगाव - मंगलुरू सेंट्रल - मडगाव (10107 / 10108) मेमू ट्रेन आणि दिवा - सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) | 02 | 27.08.2026, 11:00 वा. |
| 2 | रेल्वे गाड्यांच्या बाहेरील भागावर जाहिरातींचे प्रदर्शन - दिवा - सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105 / 10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104 / 50103), कोंकण कन्या एक्सप्रेस (20112 / 20111), मांडवी एक्सप्रेस (10104 - 10103) | 03 | 28.08.2026, 11:00 वा. |
| 3 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ होर्डिंगच्या माध्यमातून जाहिरात - महाराष्ट्र | 07 | 29.08.2026, 11:00 वा. |
| 4 | थिविम येथे व्हिडिओ वॉलद्वारे तसेच रत्नागिरी, सावंतवाडी रोड, मडगाव, थिविम, करमळी, कारवार, मुल्की, उडुपी येथील स्थानकांवर जाहिरात फलक, होर्डिंगद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात | 09 | 01.09.2026, 11:00 वा. |
| 5 | थिविम आणि करमळी येथे फूट ओव्हर ब्रिजवर जाहिरात फलकांद्वारे रेल्वे स्थानकांवर जाहिरात, करमळी येथील स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीन तसेच मडगाव येथे परिसराच्या सीमाभिंतीवर जाहिरात | 04 | 02.09.2026, 11:00 वा. |
| 6 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकल आणि सुरतकल स्थानकांवर डिजी लॉकर स्थापित करणे | 08 | 28.08.2026, 11:00 वा. |
| 7 | मानगाव, कोलाड, आडवली, विलवडे, उडुपी, थिविम, मडगाव, होन्नावर, अंकोला स्थानकांवर फेअर रिपीटरची स्थापना | 09 | 31.08.2026, 11:00 वा. |
| 8 | एसएलआर - ट्रेन क्र. 11004, 20112, 10104, 10215, 22907, 56615-II भाडेतत्त्वावर देणे | 06 | 02.09.2026, 11:00 वा. |
| 9 | कुडाळ आणि गोकर्ण रोड येथे पे पार्किंग | 02 | 31.08.2026, 11:00 वा. |
| 10 | मडगाव येथे प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) | 01 | 31.08.2026, 11:00 वा. |
| 11 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 31.08.2026, 11:00 वा. |
| 12 | मानगाव, चिपळूण, कुंदापुरा, मूकांबिका रोड बैंदूर, थिविम, थिविम-2, कारवार, करमळी येथे पे अँड यूज शौचालय सुविधा | 08 | 03.09.2026, 11:00 वा. |
| 13 | रत्नागिरी आणि उडुपी येथे बाइक पॅकिंग करार | 02 | 01.09.2026, 11:00 वा. |
| 14 | गोकर्ण रोड येथे एसी लाउंजचे संचालन आणि व्यवस्थापन | 01 | 01.09.2026, 11:00 वा. |

**अधिक माहितीसाठी संपर्क**: 1. श्री प्रवीण डावरे, मो. क्र.: 9004470597. 2. श्री विनय गावकर, मो. क्र.: 9004476129. 3. श्री मधुकुमार शेट्टी, मो. क्र.: 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया संकेतस्थळ **www.ireps.gov.in** पहा.

## जाहीर नोटीस

DATE: २०/०८/२०२६

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थि मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे-मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथिल**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| प्रभावती बाळाजी पाटील | ३१५ | - | ०-२१.२० | ३.७५ |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कररनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील प्रभावती बाळाजी पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. २१/०८/२०२६. **श्री. तुषार द. देवरे,**
ॲडव्होकेट
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को.ऑप
हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-बेलवडे बुद्रुक, ता.पेण, जि. रायगड येथील सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | २७५/२ | जिरायत ६.७६.००<br>पो.ख. ०.९०.००<br>एकूण क्षेत्र ७.६६.०० | २.३२ |

**वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी जमिन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील असलेल्या ३.६६.०० हे.आर.चौ.मी. या शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्रापैकी ०.८०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (८०.०० गुंठे ) या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील क्षेत्रापैकी ०.८०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हिस्सा हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीपैकी वरील नमुद केलेल्या क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक २१/०८/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- 'वैरागी व्हिला',पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण, चिंचपाडा रोड,
पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | मे.डीडीएसआर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स एलएलपी., डीडीएसआर ग्रुप, प्लॉट नं.- बी-८, सेक्टर- १२, कळंबोली, नवी मुंबई | ०१ बदाम झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.बी-८, सेक्टर - १२, कळंबोली, ता. पनवेल, जि.रायगड येथील भूखंडाच्या आवारातील ०१ झाड नवीन इमारतीच्या वॉल कंपाउंडचे बांधकाम करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.- PMC-PARK/464/2026-PTAD

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम )**
सादर सेवा

**खुली-ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, विभागीय विद्‌युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांच्याकडून खालील कार्यासाठी ई-खुली निविदा आमंत्रित करण्यात येत आहेत. **कार्याचे नाव**: कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रांतर्गत कुडाळ आणि कणकवली स्थानकांवर फूट ओव्हर ब्रिजसाठी प्रवासी लिफ्ट (मशीन रूम लेस), प्रत्येकी 02 नग, यांची रचना, पुरवठा, उभारणी, परीक्षण, कार्यान्वयन करण्यासाठी प्रस्ताव (20 प्रवासी लिफ्ट/1360 किग्रॅ./1 गती/2 मजले/2 स्टॉप्स/स्टेनलेस स्टील (1.5 एमएम) कार केबिन). आरडीएसओच्या मंजुरी आणि विनिर्देशनानुसार. (विनिर्देशन क्र. आरडीएसओ/2013/ ईएम/एसपीईसी/0016 (Rev-'2')-2025 अथवा नवीनतम). **निविदा सूचना क्र.: केआर/आरएन/ईएल/टी/17बी/2026, तारीख : 21.08.2026. अंदाजित खर्च**: रु. 1,02,23,923/- (जीएसटी वगळून). **निविदा प्रपत्राची किंमत**: शून्य. **ईएमडी**: रु. 2,04,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्यानुसार). **निविदा उघडण्याची तारीख**: 04.09.2026 रोजी 15.00 वा. पर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्‌युत अभियंता, एमआयडीसी एरिया, मिरजोळे, रत्नागिरी अथवा रेल्वे संकेतस्थळ (**www.ireps.gov.in**) येथील कार्यालयाशी संपर्क साधावा.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद मिळकतीमधील श्री. मनिष कमळाकर पाटील, रा. झिराडपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांचा असलेला अविभाज्य हिस्सा आमचे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहु मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ.स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहु मिळकत ही निर्वेध आहे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| झिराडपाडा ता.अलिबाग | १६४/१ | ०-४६-००<br>पो.ख.०-०२-५०<br>एकूण ०-४८-५० | १.५०/- |

अलिबाग
दिनांक :- २०-८-२०२६

**ॲड. प्रविण मधुकर ठाकूर**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफीस पत्ता - शितोळे आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा नं. ९८२२०४८३३८

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे तळवली, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक रविंद्रनाथ पांडुरंग मेस्त्री वगैरे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता.मुरूड जि.रायगड | १ | क्षेत्र ०.१८.७०<br>पो.ख ०.०२.३०<br>एकुण ०.२१.०० | २.४४ |

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.२१.०० हे. आर. आकार २.४४ रू. पैसे

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीची खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २१/०८/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे, ढवर ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग १४४ एकूण क्षेत्र ०.१४.१० (हे. आर.), आकारणी ०.२५ (रु. पैसे) व भूमापन क्र. व उपविभाग : १४५ एकूण क्षेत्र ०.४९.६० (हे.आर.), आकारणी १२.८५ (रु. पैसे) ही भातशेती मिळकत विदयमान मालक श्री. सुनिल पांडुरंग हरेर सौ. मनिषा सुनिल हरेर यांजकडुन जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विदयमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विदयमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २१/०८/२०२६.

**(ॲड.परेश एम.घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टॅड जवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
मो.९८५०४८१२३४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक जितेंद्र मधुकर म्हात्रे वगैरे ८ रा. मु. पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड असलेली बागायत मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| थळ, ता.अलिबाग | २०५/५/ब | ०-०६-१०<br>पो.ख.०-००-२०<br>एकूण ०-०६-३० | १.०० |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०८/२०२६

सही/-
**श्री.शेखर विष्णू मगर**
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा मालकी. वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे हरनेरी, ता. सुधागड जि. रायगड येथीलः - खालील वर्णनाची मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे क्र. | एकूण क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| कृष्णा गोविंद मालुसरे | ८/१/ब | ०.३७.००<br>पैकी ०.१८.००<br>हे.आर. | ०.०९ | १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त साठेकरार, अखत्यार लिएन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र निवारा. कुळवहीवाट ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी दावा दरखास्त, जप्ती मॉटॅगेज, संपादन, रिझव्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गुहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

हे कळावे.

दिनांक : २१/०८/२०२६

**ॲड. रुचिता संतोष भगत,**
ॲडव्होकेट
मु.पोष्ट जांभुळपाडा
ता. सुधागड, जि. रायगड
मोबा. नं: ९८६०२४७७३९

## जाहीर नोटीस

आमचे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

मौजे अलिबाग नगरपालिका हद्दीतील ता.अलिबाग जि.रायगड येथील समृद्धी हौसिंग सोसायटीमधील सदनिका क्र.१०२ व १०३ पहिला मजला क्षेत्र ५७२+६००=११७२ चौ.फुट (१०८.९२ चौ.मी.) या वर्णनीय सदनिका एकपक्षी अशी वर्णनाची मिळकती सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक सौ.शशी बाळकृष्ण शाह रा.बुरूमखान, वरसोली, अलिबाग यांचेकडून आमचे आशिल यांनी जाण्या-येण्याच्या रस्त्यासह सदरहू मिळकती कायम खरेदी घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकती या निर्वेध असल्याचा भवरसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमच्या आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८, दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे आशिल विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २०/०८/२०२६

सही/
**(ॲड.प्रदिप गंगाधर नाईक)**
ऑफिस-मु.पो.आक्षी
ता.अलिबाग, जि.रायगड
(खरेदीदारांचे वकील)
मो.नं.७३५०७०१३००/९३७३२४१३००

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक १.श्यामसुंदर काशिनाथ कामत, २. स्वाती श्यामसुंदर कामत, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**मौजे वाकस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर जुना | नवीन सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| वाकस | ७८/९ | ४४/९ | ०.२४.०० | ०.२५ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २१/०८/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०,
कर्जत, दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - कडाव, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.हरिश्चंद्र वाळकू आढाव, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| कडाव | ३५/४ | १.३१.५० | ४.७० |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. २१/०८/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत, दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शुक्रवार । दि. २१ ऑगस्ट २०२६ । अंक ७६ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## १२ सप्टेंबरला राष्ट्रीय लोकअदालत

**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १२ सप्टेंबर २०२६ रोजी रायगड जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. प्रलंबित तसेच वादपूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. बी. अग्रवाल यांनी केले आहे.या लोकअदालतीत न्यायालयांमध्ये प्रलंबित दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, अपिले, मोटार अपघात दावे, विवाहविषयक प्रकरणे तसेच ग्रामपंचायतींची पान ५ वर

## नऊ मच्छिमारांची सुखरुप सुटका

**उरण :** मासेमारीसाठी समुद्रात गेलेल्या 'विनायक' या बोटीच्या इंजिन कक्षात अचानक मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने नऊ मच्छिमारांच्या जीवावर बेतण्याची वेळ आली. पाणी वाढल्याने इंजिन बंद पडले आणि समुद्राच्या लाटांवर बोट हेलकावे खाऊ लागली. बोट बुडण्याचा धोका निर्माण झाल्याने मच्छिमारांनी तातडीने मदतीसाठी संपर्क साधला. माहिती मिळताच येलोगेट पोलिसांनी स्थानिक मच्छिमारांच्या मदतीने बचावकार्य हाती घेतले आणि सर्व नऊ मच्छिमारांना सुखरूप किनाऱ्यावर आणण्यात यश आले. पान ५ वर

# जेएनपीएत ३०० कोटींच्या मेथाम्फेटामाइनचा पर्दाफाश




**। उरण । प्रतिनिधी ।**

देशाच्या महत्त्वाच्या बंदरांपैकी एक असलेल्या जेएनपीएच्या उंबरठ्यावर तब्बल ३०० कोटी रुपयांच्या अमली पदार्थांच्या तस्करीचा धक्कादायक प्रयत्न उघडकीस आला आहे. महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) केलेल्या धडक कारवाईत कंटेनरमधील मक्याच्या गोणींत लपवून ठेवलेला तब्बल ५५ किलो मेथाम्फेटामाइनचा साठा जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील या अमली पदार्थाची किंमत सुमारे ३०० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या कारवाईमुळे जेएनपीए परिसरातील अमली पदार्थ तस्करीच्या धोक्याचा पुन्हा एकदा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

डीआरआयच्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनंतर जेएनपीए परिसरातील एका कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये संशयित कंटेनरची कसून तपासणी करण्यात आली. कंटेनरमध्ये उत्तर प्रदेशातून परदेशात पाठविण्यात येणाऱ्या मक्याच्या गोणी होत्या. तपासणीदरम्यान पान ५ वर

### एका गोणीने फोडला करोडोंचा कट!

कंटेनरची बारकाईने तपासणी सुरू असताना एका मक्याच्या गोणीमध्ये लपविलेला संशयास्पद पदार्थ अधिकाऱ्यांच्या हाती लागला. फॉरेन्सिक तपासणीत तो मेथाम्फेटामाइन असल्याचे स्पष्ट झाले आणि त्यानंतर तब्बल ५५ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोन जणांना ताब्यात घेण्यात आले असून, तस्करीच्या संपूर्ण साखळीचा शोध घेण्यासाठी तपास वेगाने सुरू आहे.

### मक्याच्या आडून अमली पदार्थांचा खेळ

प्राथमिक तपासात या तस्करीमागे पाकिस्तानस्थित अमली पदार्थ तस्कर महंमद हुसेन दाद याच्या सिंडिकेटचा संबंध असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. मालवाहू कंटेनरच्या माध्यमातून विविध देशांमध्ये अमली पदार्थ पोहोचविण्यासाठी हे जाळे सक्रिय असल्याचा संशय असून, त्यादृष्टीने तपास सुरू आहे. तपासानुसार, सिंडिकेटच्या हँडलर्सनी मुंबईतील काही आयात-निर्यातदार कंपन्यांशी संपर्क साधला होता. उत्तर प्रदेशातील एका व्यापारी संस्थेच्या माध्यमातून सुमारे २२ टन मका परदेशात पाठविण्याचे नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी सुमारे १७.५ टन मका पॅक करून जेएनपीएतील सीएफएसमध्ये आणण्यात आला होता. मात्र, डीआरआयच्या गुप्त माहितीमुळे तस्करांचा डाव उधळला गेला.

# 'जलजीवन'चा अहवाल खोटा?

- **खासदार सुनील तटकरे यांचा दावा**
- **रायगडच्या जलजीवनवर दिल्लीची नजर**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामांचा बोजवारा उडाल्याचा आरोप आता थेट दिल्लीच्या दरबारी पोहोचला आहे. जिल्ह्यातील ९० टक्के योजना पूर्ण झाल्या असून, ९५ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचल्याचा अहवाल केंद्र सरकारला पाठविण्यात आला आहे. हा अहवाल चुकीचा, दिशाभूल करणारा आणि वस्तुस्थितीला धरून नसल्याचा दावा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी केला. जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे अपूर्ण असताना आणि अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे झाल्याच्या तक्रारी असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात योजना पूर्ण झाल्याचा दावा करणाऱ्या अहवालावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




जलजीवन मिशनच्या कामाबाबतची वस्तुस्थिती केंद्रीय जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांच्या निदर्शनास आणून दिल्याची माहिती खासदार तटकरे यांनी अलिबाग येथे पत्रकार परिषदेत दिली. पर्यटन, टोल, क्रीडा, रेल्वे आणि मुंबई-गोवा महामार्गासह विविध विषयांवर त्यांनी यावेळी भाष्य केले.

पाणीटंचाई दूर करण्यासाठी केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशनची रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत अंमलबजावणी करण्यात आली. या योजनेंतर्गत प्रत्येक व्यक्तीला दररोज किमान ५५ लीटर पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये तब्बल १,४२२ योजनांची कामे हाती घेण्यात आली.

मात्र, कोट्यवधी रुपये खर्चूनही अनेक गावांमध्ये घरांपर्यंत पाणी पोहोचले नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अपूर्ण कामे, निकृष्ट दर्जाची कामे आणि पाणीपुरवठ्याच्या समस्यांमुळे जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीवर यापूर्वीच प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेतही या मुद्द्यावर जोरदार चर्चा झाली होती.

दरम्यान, जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामांसाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पात रेल्वेचा समावेश करण्यात आल्याची माहितीही तटकरे यांनी दिली. त्यामुळे अलिबागला रेल्वे जोडणी होण्याचा मार्ग मोकळा झाल्याचा दावा त्यांनी केला.

### दिल्लीतील बैठकीत अहवालावर सवाल

रायगडमधील जलजीवन मिशनच्या कामांची माहिती खा. सुनील तटकरे यांनी केंद्रीय जलशक्तीमंत्री सी.आर. पाटील यांच्याकडे मांडली. त्यानंतर महाराष्ट्र सदनात राज्यातील खासदारांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगाऊ रक्कम घेऊनही त्याप्रमाणात काम न करणाऱ्या ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई केली जाणार असल्याचे केंद्रीय मंत्र्यांनी सांगितल्याची माहिती तटकरे यांनी दिली. याच बैठकीत ९० टक्के योजना पूर्ण झाल्या असून ९५ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणी पोहोचल्याचा अहवाल प्राप्त झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, या आकडेवारीवर तटकरे यांनी आक्षेप घेतला. रायगड जिल्ह्याची प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असून, हा अहवाल चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे त्यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे सांगितले. अहवालातील आकडेवारी आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिस्थिती यामध्ये तफावत असल्यास त्याची जबाबदारी निश्चित होण्याची शक्यता आहे.

> जलजीवन मिशन अंतर्गत नळ कनेक्शन आणि घरापर्यंत पाणी पोहोचल्याचा अहवाल देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्यात आले आहेत. यासाठी लॉगिन आणि पासवर्ड ग्रामपंचायतींकडे देण्यात आले असून, संबंधित अहवाल ऑनलाइन पद्धतीने थेट केंद्र सरकारकडे पाठविला जातो.
>
> – मोहन सरवदे, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद

## वेधक

### पुण्यात प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू

**पुणे :** प्रसूतीसाठी मायमर हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या ३७ वर्षीय महिलेचा आणि तिच्या नवजात बाळाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर नातेवाईकांनी संताप व्यक्त करत डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिला आणि बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. मृत महिलेचे नाव रूपाली सोमनाथ इंदलकर (३७, रा. कुसगाव बुद्रुक, ता. मावळ) असे आहे. प्रसूतीसाठी त्यांना मायमर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान महिला आणि तिच्या नवजात बाळाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त झालेल्या नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

### तरुणाला सव्वा कोटी रुपयांना गंडा

**उरण :** तालुक्यातील विंधने (धाकटी जुई) येथील २६ वर्षीय तरुणाची 'खेलो २४ मॅच' या ऑनलाइन गेमिंग ॲपद्वारे तब्बल १ कोटी २७ लाख ३१ हजार २०२ रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शुभम रामचंद्र घरत यांना ऑक्टोबर २०२४ मध्ये मित्रामार्फत या ॲपची माहिती मिळाली. सुरुवातीला कमी रकमेच्या पैजा जिंकल्यानंतर पैसे मिळाल्याने त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर तोटा भरून काढण्याच्या तसेच मोठी रक्कम जिंकण्याच्या आमिषाने त्यांनी विविध बँक खात्यांतून क्यूआर कोड व यूपीआयद्वारे २२० हून अधिक व्यवहार केले. मात्र, तब्बल १ कोटी २७ लाख रुपये जमा करूनही त्यांना कोणतीही रक्कम परत मिळाली नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी तीन अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायबर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# नाशिकच्या घरफोडीचे सूत्रधार आरसीएफमध्ये?

- **स्थानिकांना गेट बंद; चोरट्यांचा मात्र खुला वावर?**
- **अलिबाग आणि नाशिक पोलिसांची संयुक्त कारवाई**
- **आरसीएफच्या वसाहतीमधून दोघे जेरबंद**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नाशिकमध्ये घरफोडी करून अलिबागमध्ये नातेवाईकांकडे लपून बसलेल्या दोघांना अखेर पोलिसांनी जेरबंद केले. अलिबाग आणि नाशिक पोलिसांनी संयुक्त कारवाई करत नाशिकच्या घरफोडीच्या सूत्रधारांना अलिबागमधून ताब्यात घेतले. ही कारवाई आरसीएफ कर्मचारी वसाहतीमध्ये करण्यात आली असून, ताब्यात घेण्यात आलेले दोघे एका कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नातेवाईक असल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे आरसीएफचे कर्मचारी आणि मेडिकल कॉलजचे विद्यार्थी यांनाच वसाहतीमध्ये परवानगी असताना चोरटे आत घुसलेच कसे, असा सवाल उपस्थित होत आहे. या घटनेनंतर आरसीएफ प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिकमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा शोध नाशिक पोलीस घेत होते. तपासादरम्यान घरफोडी करणारे दोघेजण अलिबागमध्ये त्यांच्या नातेवाईकांकडे लपून बसल्याची माहिती नाशिक पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच नाशिक पोलिसांच्या पथकाने गुरुवारी अखेर अलिबाग गाठले. अलिबाग पोलिसांच्या मदतीने लपलेल्या दोन्ही चोरट्यांचा शोध सुरू करण्यात आला. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी आरसीएफ कर्मचारी वसाहतीपर्यंत मजल मारली.

अलिबागमधील आरसीएफ कर्मचारी वसाहतीमध्ये चोरटे लपल्याची माहिती मिळताच अलिबाग पोलीस आणि नाशिक पोलिसांनी संयुक्तरित्या छापा टाकला. पोलिसांच्या या कारवाईत दोघांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी हे मूळचे नाशिक जिल्ह्यातील असून, त्यांचे नातेवाईक पान ५ वर

# चवदार तळ्याच्या विकासकामांना गती देणार : मंत्री संजय शिरसाट



**। महाड । प्रतिनिधी ।**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समता आणि मानवमुक्तीच्या ऐतिहासिक लढ्याची साक्ष देणाऱ्या महाडच्या ऐतिहासिक चवदार तळ्याची गुरुवारी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी पाहणी केली. २० मार्च १९२७ रोजी झालेल्या ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाला २०२७ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर परिसरातील विकासकामे, नियोजन आणि आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला.

चवदार तळे हे केवळ ऐतिहासिक स्थळ नसून सामाजिक समता, स्वाभिमान, सामाजिकन्याय आणि मानवमुक्तीच्या विचारांची प्रेरणाभूमी आहे. त्यामुळे आगामी शताब्दी वर्षानिमित्त येथे होणारा सोहळा भव्य आणि ऐतिहासिक ठरावा, यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचे नियोजन करण्यात येणार असल्याचे मंत्री शिरसाट यांनी सांगितले.

चवदार तळे परिसरातील प्रलंबित व आवश्यक कामांना गती देण्यावर भर देण्यात येणार असून, नागरिकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, परिसर सुशोभीकरण, स्वच्छता, सुरक्षा, वाहतूक व्यवस्था तसेच इतर पान ५ वर

## चाकरमान्यांच्या खिशाला कात्री!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नागपूरसह विविध शहरांत राहणारे कोकणातील चाकरमानी आपल्या गावच्या वाटेला लागण्याची तयारी करतात. वर्षभर ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहिली जाते, त्या बाप्पाच्या दर्शनासाठी घराकडे निघालेल्या या भाविकांच्या उत्साहावर मात्र रेल्वेचे वाढीव भाडे आणि विलंबाचे सावट पडले आहे. आराध्य दैवत गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या चाकरमान्यांकडून भरमसाठ भाडे आकारायचे आणि पान ५ वर

# नकाशात 'सीआरझेड', प्रत्यक्षात कांदळवन

**निडी-साळाव प्रकरण मंत्रालयाच्या दारात**



**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

नकाशावर एक नोंद आणि प्रत्यक्ष जागेवर दुसरेच वास्तव असल्याचा दावा करत निडी-साळाव परिसरातील कांदळवन संवर्धनाचा वाद आता थेट मंत्रालयापर्यंत पोहोचला आहे. मौजे निडी (मजरे इस्लामपूर) येथील ग्रामस्थ राजू रामभाऊ बापलेकर आणि प्रमोद शंकर नागोठणेकर यांनी महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाकडे (एमसीझेडएमए) तक्रार दाखल करून सीझेडएमची नकाशातील नोंदी आणि प्रत्यक्ष स्थळस्थितीची संयुक्त तपासणी करण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे, १५ जुलै २०२६ रोजी झालेल्या स्थळ पाहणीच्या पंचनाम्यात मोठ्या प्रमाणात कांदळवन असल्याची नोंद झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित क्षेत्र सीझेडएमपी नकाशात सीआरझेड-आयबी म्हणून दर्शविण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष जागेवर नैसर्गिक आणि जिवंत कांदळवन असल्याचे आढळून आले आहे. जिल्हाधिकारी तसेच वन विभागाकडे यापूर्वी पान ५ वर

**भक्तांना उच्च न्यायालयाचा दिलासा | मूर्ती समुद्रात करता येणार विसर्जन**

# गणेशमूर्ती विसर्जनाचे 'विघ्न' दूर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला असताना गणरायाच्या भक्तांसाठी मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. पीओपीच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनावरून निर्माण झालेला संभ्रम तूर्त दूर झाला असून, अंतिम निकाल येईपर्यंत सहा फुटांवरील पीओपी गणेशमूर्तींचे समुद्र आणि नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये विसर्जन करता येणार आहे. त्यामुळे बाप्पाच्या आगमनाची तयारी करणाऱ्या गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पीओपी गणेशमूर्तींच्या निर्मिती, विक्री आणि विसर्जनासंदर्भातील याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या प्रकरणाचा अंतिम निकाल न्यायालयाने राखून ठेवला आहे. दरम्यान, अंतिम निकाल येईपर्यंत नेमका कोणता आदेश लागू राहणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. पान ५ वर



### सहा फुटांखालील मूर्तींसाठी कृत्रिम तलावच

दरम्यान, सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या पीओपी गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये विसर्जन करता येणार नाही. अशा मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्येच करणे बंधनकारक राहणार आहे.

### २४ जुलैचा आदेश कायम

न्यायालयाने स्पष्ट केले की, अंतिम निकाल येईपर्यंत २४ जुलै २०२५ रोजीचा अंतरिम आदेश लागू राहील. या आदेशानुसार सहा फुटांवरील पीओपी गणेशमूर्तींचे समुद्रासह नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये विसर्जन करण्यास परवानगी आहे. यापूर्वी १४ ऑगस्टच्या आदेशात ९ जून २०२५चा अंतरिम आदेश अंतिम निकालापर्यंत लागू राहील, असे नमूद करण्यात आले होते. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी मूर्तींच्या विसर्जनाबाबत मोठा संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, राज्य सरकारने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, २४ जुलै २०२५च्या आदेशाने सहा फुटांवरील पीओपी मूर्तींच्या नैसर्गिक जलप्रवाहांतील विसर्जनाला ३१ मार्च २०२६पर्यंत परवानगी दिली होती. त्यानंतर न्यायालयाने २४ जुलैचा आदेशच अंतिम निकालापर्यंत लागू राहील, असे स्पष्ट केले.




# पीएम केअर्स फंडाचे गूढ

कल्पना करा, एखाद्या पंतप्रधानाने आठ हजार कोटी रुपयांच्या देणग्या स्वतःच्या जवळपास खासगी फंडात जमवून ठेवल्या आहेत आणि त्याच्याबाबत संसदेत, माहिती अधिकारात कोणताही सवाल विचारायचा नाही असे बंधन घालून ठेवले आहे. शिवाय, ज्यासाठी हा फंड स्थापन झाला होता त्यासाठी एक पैसाही खर्च झालेला दिसत नाही. ऑडिटही वेळच्या वेळी होत नाही. उघडच आहे की, हा सर्व व्यवहार भानगडीचा आहे असेच कोणीही म्हणेल. यावर जोरदार टीका होईल. त्या पंतप्रधानाला उत्तर द्यावे लागेल. काँग्रेसच्या काळात असे काही झाले असते तर आज देश केवळ या एकाच गोष्टीवर बोलत असता. भाजपवाल्यांनी याला फंड कांड असे नाव दिले असते. पंतप्रधानांच्या प्रतिमा देखील जाळल्या असत्या. गंमत अशी की, आज नरेंद्र मोदींच्या नावाने हे प्रत्यक्ष घडत असूनही देश शांत आहे. कारण विरोधात भाजप नावाचा पक्ष नाही. रा.स्व.संघ नावाची कुजबूज करणारी संघटना नाही. या देशात पंतप्रधान मदत निधी स्वातंत्र्य मिळाल्यापासून अस्तित्वात आहे. उद्योगपती व इतरांनी त्यासाठी नियमित देणग्या दिल्या आहेत. तोही एक बिनसरकारी फंड असला तरी त्याचे हिशेब नेहमी सर्वांसमोर मांडले गेले आहेत. वादळे, भूकंप, अपघात इत्यादी परिस्थितीत नुकसान झालेल्यांना या फंडातून वेळोवेळी मदत केली गेली आहे. नरेंद्र मोदी सरकारने २०१९ सालापर्यंत याच फंडाद्वारे काम केले. पण कोविडच्या दरम्यान स्वतःचा वेगळा फंड हवा असे त्यांना वाटू लागले. त्यानुसार पीएम केअर्स फंडाची स्थापना करण्यात आली. पंतप्रधान मोदी त्याचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. संरक्षणमंत्री, गृहमंत्री आणि अर्थमंत्री या पदावर असलेले लोक त्याचे विश्वस्त असतील अशी व्यवस्था आहे. मात्र हा सरकारी फंड नाही. त्याचे ऑडिट सरकारची कॅग ही संस्था करू शकत नाही. संसदेत त्यावर प्रश्न विचारले जाऊ शकत नाही. या फंडामध्ये पैसे आले कुठून व खर्च कशावर झाले याची माहिती देणे बंधनकारक नाही.

## कार्यालय सरकारी, कारभार बिनसरकारी

पीएम केअर्स फंडावर मोदींचा फोटो आहे. या फंडासाठी देणग्या द्या असे आवाहन करणाऱ्या त्यांच्या जाहिराती वारंवार दिसत असत. सरकारी कंपन्या, बँका इत्यादींच्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून या फंडासाठी सक्तीने काही रक्कम कापली गेली. दिल्लीतील एम्सच्या डॉक्टरांनी या सक्तीच्या कपातीला विरोध केला. ते बहुदा डॉक्टर असल्याने तो मान्य केला गेला. बाकी इतर खात्यातील कारकून आणि मान खाली घालणारे साहेब यांच्या खात्यातून मात्र एक दिवसाचा पगार कापला गेला. या फंडाचा कारभार पंतप्रधानांच्या कार्यालयातून सरकारी अधिकारी चालवतात. सक्तीची देणगी वसुलीही सरकारी लोकांकडून होते. तरीही या फंडाविषयी माहिती विचारली गेली तेव्हा हा फंड सार्वजनिक नाही, सबब ती देता येत नाही असे सांगितले गेले. कहर म्हणजे सर्वोच्च न्यायालयानेही हा युक्तिवाद मान्य केला. इंदिरा गांधी यांच्या अलाहाबादच्या एका प्रचारसभेत सरकारी अधिकाऱ्यांनी स्टेज उभारायला मदत केली या कारणावरून त्यांची निवडणूक रद्द करण्यात आली होती. इथे पंतप्रधानांच्या कार्यालयातील अधिकारी बिनबोभाट एक खासगी ट्रस्ट चालवतात आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयही काही बोलत नाही. हा काळाचा महिमा म्हणायला हवा. मोदींच्या नावामुळे या फंडाला दणादण देणग्या मिळाल्या. एरवी ज्या कंपन्या पंतप्रधान मदत निधीला देणग्या देत होत्या त्या आता इकडे देऊ लागल्या. तिकडचा निधी कमी होऊ लागला.आज मूळ पंतप्रधान निधीमध्ये जेमतेम साडेतीनशे कोटी रुपये आहेत. तर मोदींच्या नव्या फंडामध्ये आठ हजार ४५२ कोटी म्हणजे जवळपास बावीस पट पैसे आहेत. या निधीचा उपयोग चांगल्या कारणांसाठी होत असता तरी ते क्षम्य ठरले असते. पण वास्तवात तसे होत नाही. या ट्रस्टचे २३-२४ व २४-२५ या दोन वर्षांचे ऑडिट अहवाल नुकतेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार २४-२५ या वर्षात या निधीत बाराशे कोटी रुपयांची भर पडली आणि तो सुमारे साडेआठ हजार कोटी झाला. पण त्यातून केवळ ८७ लाख रुपये खर्च झाले. ही रक्कम शून्य पूर्णांक एक शतांश टक्के इतकी येते. या निधीतील रक्कम फिक्स्ड डिपॉझिटमध्ये ठेवण्यात आली असून त्यावर तब्बल ४७५ कोटी रुपये व्याज मिळाले आहे. या दरम्यानच्या काळात केरळसह अनेक राज्यांमध्ये पूर आला. महाराष्ट्रालाही गेल्या वर्षी अतिवृष्टीचा मोठा तडाखा बसला. पण यापैकी कोणालाच मोदींच्या पीएम केअर्समधून मदत मिळू शकली नाही.

## मुलांना पैसे मिळाले का?

या ऑडिट अहवालातून आणखी एक भानगड समोर आली आहे. कोविडच्या काळात या निधीतून सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यातले २००० कोटी व्हेंटिलेटर्ससाठी, एक हजार कोटी स्थलांतरीत मजुरांच्या कल्याणासाठी आणि शंभर कोटी लस विकसित करण्यासाठी देण्यात आले. यातले व्हेंटिलेटर्सचे हजारो कोटी रुपये हे गुजरातच्या कंपन्यांना दिले गेले असा आरोप झाला. कहर म्हणजे त्यातले अनेक व्हेंटिलेटर्स खराब होते असे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापुढील खटल्यात निष्पन्न झाले. स्थलांतरीत मजुरांना नेमके किती पैसे दिले गेले याची काहीही आकडेवारी दिली गेली नाही. याच दरम्यान पीएम केअर्स चिल्ड्रन फंडातून कोविडमध्ये अनाथ झालेल्या मुलांना पैसे दिले जातील असे जाहीर झाले. या पोटीची भावना ध्यानात घेऊन अगदी सामान्य स्थितीतल्या नागरिकांनीही या निधीला मदत केली. त्यानुसार ३३८३ मुले निवडण्यात आली. यांना दरवर्षी प्रत्येकी वीस हजार रुपये दिले जातील असे जाहीर केले गेले होते. त्यानुसार निव्वळ या मुलांसाठीच्या रकमेपोटी किमान सात कोटी रुपये निधीतून खर्ची पडायला हवे होते. वास्तवात निधीमधून संपूर्ण वर्षात केवळ ८७ लाखच खर्ची पडले आहेत. हे पैसे नेमके कशावर खर्च झाले आहेत याचा तपशील उघड केलेला नाही. हे सर्व पैसे त्या मुलांसाठीच दिले गेले आहेतअसे गृहित धरले तर तीन हजारांवर मुलांना प्रत्येकी २५९६ रुपये दिले गेले असे म्हणावे लागेल. किंवा आश्वासन दिल्याप्रमाणे वर्षाचे वीस हजार रुपये दिले गेले असतीलच तर केवळ ४३९ मुलांनाच हे पैसे दिले गेले आहेत असे निष्पन्न होईल. एकूण हा सर्वच गडबडगुंडा आहे. मोदी सोडून अन्य कोणाही बाबतीत हे घडले असते तर पंतप्रधानांनी मुलांच्या नावाने लबाडी केली असा गवगवा झाला असता. पण मोदींच्या बाबत चकार शब्द काढायला त्यांची भाडोत्री माध्यमे तयार नाहीत. त्यामुळे या प्रश्नाची अजिबात कोठेही चर्चा नाही. हे सर्व पैसे फिक्स्ड डिपॉझिटमध्ये सुरक्षित आहेत असा दावा कदाचित मोदींच्या वतीने केला जाईल. पण बँकेतच पैसे ठेवायचे असतील तर मुळात हा वेगळा निधी निर्माण केलाच कशाला याचे उत्तर द्यावे लागेल. शिवाय, लपवण्यासारखे काहीच नसेल तर या निधीमध्ये कोणी किती पैसे दिले व ते कशावर खर्च झाले याचे तपशील का गुप्त ठेवले जात आहेत हेही सांगावे लागेल. पंतप्रधानांचे नाव वापरायचे, जनतेकडून पैसे जमा करायचे आणि नंतर त्याच जनतेला काहीही जाणून घ्यायचा अधिकार नाही असे म्हणायचे ही सरळ सरळ भानगडीची लक्षणे आहेत.

विचार

# निरोगी समाजनिर्मितीचे पाऊल

***अन्न आणि औषध प्रशासनाने शाळांच्या परिसरात जास्त चरबी, ट्रान्स फॅट आणि साखर असलेल्या खाद्यपदार्थांच्या विक्री, जाहिरात आणि प्रचारावर बंदी घालण्याचा घेतलेला निर्णय सार्वजनिक आरोग्य धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. दोन-तीन दशकांनंतरचा निरोगी समाज घडवण्याच्या दिशेने टाकलेले हे उत्तम पाऊल आहे. विद्यार्थ्यांच्या आहाराच्या सवयींमध्ये बदल घडवून आणण्यासाठी उचललेले हे महत्वाचे पाऊल आहे.***



डॉ.अजिंक्य बोराडे

एके काळी भारतीय समाजासमोर कुपोषण हे सर्वात मोठे आव्हान होते. आजही अनेक भागांमध्ये ते कायम आहे; मात्र त्याच वेळी दुसऱ्या टोकाची समस्या वेगाने वाढत आहे. ती म्हणजे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि बालवयात दिसू लागलेले जीवनशैलीशी संबंधित आजार. या आजारांची बीजे बालपणातच रोवली जातात. चुकीचा आहार, व्यायामाचा अभाव, स्क्रीनसमोर घालवला जाणारा वाढता वेळ आणि फास्ट फूडची सवय यामुळे आजची मुले उद्याच्या आरोग्यसंकटाकडे वाटचाल करत आहेत. शाळांच्या परिसरात 'जंक फूड'ची दुकाने उभी राहणे ही आता इतकी सामान्य बाब झाली आहे, की अनेक मुलांचा दिवसच त्याशिवाय पूर्ण होत नाही. सकाळी शाळेत जाताना पॅकेज्ड स्नॅक्स, मधल्या सुट्टीत सॉफ्ट ड्रिंक, शाळा सुटल्यानंतर बर्गर किंवा पिझ्झा, घरी गेल्यावर पुन्हा चॉकलेट किंवा वेफर्स अशा पदार्थांचा अनेक विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आहारामध्ये सर्रास समावेश पहायला मिळतो. यामध्ये शरीराला आवश्यक पोषणमूल्यांपेक्षा साखर, मीठ आणि तेलाचे प्रमाण अनेक पटींनी जास्त असते. परिणामी, मुलांचे वजन वाढते, शारीरिक क्षमता कमी होते आणि अभ्यासावरही परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटना अनेक वर्षांपासून सांगत आहे, की मुलांमध्ये वाढणारा लठ्ठपणा हा येत्या काळातील सर्वात मोठ्या आरोग्यविषयक संकटांपैकी एक आहे. भारतातही ही समस्या महानगरांपासून लहान शहरांपर्यंत पोहोचली आहे. ग्रामीण भागातही प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ सहज उपलब्ध झाल्यामुळे परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी महाराष्ट्राने घेतलेला निर्णय केवळ राज्यांपुरता मर्यादित राहणार नाही, तर इतर राज्यांसाठीही दिशादर्शक ठरू शकतो. या निर्णयाचे श्रेय केवळ बंदीला नाही, तर त्यामागील विचाराला आहे.

शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसते. ती मुलांचे व्यक्तिमत्त्व घडवते. तेथे स्वच्छतेचे, वेळेचे, शिस्तीचे, पर्यावरणाचे आणि आरोग्याचे संस्कार केले जातात. मग शाळेच्या प्रवेशद्वाराबाहेरच मुलांना आरोग्याला अपायकारक पदार्थ सहज उपलब्ध असतील, तर वर्गात शिकवले जाणारे पोषणशास्त्र कितपत प्रभावी ठरेल? एका हाताने आरोग्याचे धडे द्यायचे आणि दुसऱ्या हाताने मुलांना 'जंक फूड'कडे ढकलायचे, ही विसंगती दूर करण्यासाठी हा निर्णय आवश्यक होता. अर्थात, बंदी हा अंतिम उपाय नाही. उलट, ती सुरुवात आहे. कोणत्याही सामाजिक बदलासाठी कायद्यापेक्षा मानसिकता महत्त्वाची असते. हेल्मेट सक्ती, सीटबेल्ट, तंबाखूबंदी किंवा प्लास्टिकबंदीचे अनुभव सांगतात की, फक्त आदेश काढून वर्तन बदलत नाही. त्यासाठी सातत्याने जनजागृती, कठोर अंमलबजावणी आणि सामाजिक सहभाग आवश्यक असतो. 'जंक फूड'च्या बाबतीतही हेच तत्व लागू आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका पालकांची आहे. अनेकदा पालकच मुलांच्या प्रत्येक छोट्या यशानंतर पिझ्झा किंवा बर्गर खायला घेऊन जातात. घरात स्वयंपाक करण्याऐवजी 'ऑनलाइन फूड डिलिव्हरी'वर अवलंबून राहण्याची प्रवृत्ती वाढली आहे. मुलांच्या हट्टापुढे पालकही माघार घेतात. त्यामुळे मुलांच्या मनात 'जंक फूड' म्हणजे आनंद आणि घरचा आहार म्हणजे शिक्षा, अशी मानसिकता तयार होते. ही मानसिकता बदलल्याशिवाय केवळ शाळांभोवती बंदी घालून अपेक्षित परिणाम मिळणार नाही.

गेल्या दोन दशकांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत आक्रमक प्रवेश केला. आकर्षक जाहिराती, कार्टून पात्रे, सेलिब्रिटींचा वापर, 'सोशल मीडिया'वरील प्रचार आणि मुलांना लक्ष्य करणाऱ्या विपणन तंत्रामुळे जंक फूडची 'कूल' आणि 'आधुनिक' अशी प्रतिमा तयार करण्यात आली. कंपन्यांचा व्यवसाय करणे चुकीचे नाही; परंतु मुलांच्या आरोग्याशी तडजोड करून नफा कमावणे स्वीकारार्ह ठरू शकत नाही. त्यामुळे अशा उत्पादनांवरील जाहिरातींवर अधिक कठोर नियमांची गरज आहे. 'एफडीए'ने मुख्याध्यापकांवर या आदेशाच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपवली आहे; परंतु ही जबाबदारी केवळ शाळांची नाही. स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिस, अन्न सुरक्षा अधिकारी आणि शिक्षण विभागाने एकत्रितपणे निरीक्षण यंत्रणा उभी केली पाहिजे. शाळेपासून किती अंतरापर्यंत 'जंक फूड' विक्रीवर बंदी असेल, याची स्पष्ट व्याख्या झाली पाहिजे. उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ दंड आणि परवान्यांवर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा, काही दिवसांमध्येच आदेशाचा प्रभाव कमी होईल. याबरोबरच एक सकारात्मक पर्याय उभा करणेही आवश्यक आहे. मुलांना 'जंक फूड' नको असेल, तर त्यांना पौष्टिक आणि चविष्ट पर्याय उपलब्ध करून द्यावे लागतील. शाळांच्या कँटीनमध्ये मोड आलेली कडधान्ये, फळे, ताक, लस्सी, रागी, ज्वारी, बाजरीपासून बनवलेले पदार्थ, भाजीपाला सँडविच, उपमा, पोहे, इडली, ढोकळा आदींना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्थानिक शेतकरी उत्पादक गट आणि महिला बचत गटांना या प्रक्रियेत सहभागी करून घेतले, तर आरोग्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल.

अलिकडे एक प्रश्न वारंवार उपस्थित केला जातो - लोकांनी काय खावे, हे सरकारने ठरवावे का? हा प्रश्न योग्य आहे; परंतु येथे सरकार कोणाच्याही घरातील ताटात हस्तक्षेप करत नाही. ते फक्त शाळांच्या परिसरात मुलांना सहज उपलब्ध होणाऱ्या आरोग्याला अपायकारक पदार्थांवर निर्बंध आणत आहे. तंबाखू, सिगारेट किंवा मद्यविक्रीवर शाळांजवळ जशी बंदी असते, त्याच धर्तीवर मुलांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे याकडे वैयक्तिक स्वातंत्र्यावर गदा म्हणून नव्हे, तर सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक नियमन म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. आज जगभरात 'फूड लिटरसी' म्हणजे अन्नविषयक साक्षरतेवर भर दिला जात आहे. मुलांना केवळ गणित आणि विज्ञान शिकवून चालणार नाही, तर त्यांनी आपल्या ताटातील अन्नाचे महत्त्वही समजून घेतले पाहिजे. कोणत्या पदार्थात किती साखर आहे, 'ट्रान्स फॅट' म्हणजे काय, जास्त मीठाचे दुष्परिणाम कोणते, पॅकेजवरील पोषणमूल्ये कशी वाचायची याचे शिक्षण शालेय स्तरावरच दिले गेले पाहिजे. हा निर्णय त्या दिशेनेही एक पाऊल ठरू शकतो. या निर्णयाचा दीर्घकालीन आर्थिक परिणामही सकारात्मक असू शकतो. जीवनशैलीशी संबंधित आजारांवर उपचार करण्यासाठी कुटुंबांना लाखो रुपये खर्च करावे लागतात. सरकारच्याही आरोग्य व्यवस्थेवर मोठा ताण येतो. मात्र, बालपणापासूनच निरोगी आहाराच्या सवयी निर्माण झाल्या, तर भविष्यात आरोग्य खर्च कमी होईल, उत्पादकता वाढेल आणि देशाला निरोगी कार्यबल मिळेल. त्यामुळे हा निर्णय खर्च नसून भविष्यातील गुंतवणूक आहे.

'एफडीए'चे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी घेतलेला हा निर्णय धाडसी आहे. कारण अशा निर्णयांना नेहमीच काही व्यावसायिक हितसंबंधांचा विरोध असतो; परंतु प्रशासनाचे काम लोकप्रिय निर्णय घेणे नसून जनहिताचे निर्णय घेणे आहे. त्यामुळे या आदेशाचे स्वागत करतानाच त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी समाजानेही पुढाकार घेतला पाहिजे. आजची मुले उद्याचा भारत घडवणार आहेत. त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे ही केवळ त्यांच्या पालकांची जबाबदारी नाही, तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शाळेच्या गेटबाहेर उभा असलेला 'जंक फूड'चा स्टॉल काढून त्या जागी फळांचा किंवा पौष्टिक खाद्यपदार्थांचा स्टॉल उभा राहिला, तर तो केवळ एका दुकानाचा बदल ठरणार नाही, तर समाजाच्या विचारातील बदल असेल. महाराष्ट्राने त्या बदलाची सुरुवात केली आहे. आता या निर्णयाला जनतेचा पाठिंबा, प्रशासनाची कठोर अंमलबजावणी आणि पालकांची सजग साथ मिळाली, तरच या निर्णयामागील उद्देश खऱ्या अर्थाने सफल होईल. निरोगी बालपण, निरोगी समाज आणि सक्षम राष्ट्र यांचा पाया अशाच छोट्या पण दूरगामी निर्णयांतून रचला जात असतो.

चर्चा आजची

# भाषेचा घसरलेला दर्जा

सुयोग आंग्रे

दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनानंतर तथाकथित जनरल-जी आंदोलन केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याने संपले, परंतु लोकशाही प्रतिकाराचे प्रतीक असलेल्या देशाचे पंतप्रधान आणि इतर पदाधिकाऱ्यांबद्दल जाहीरपणे केलेल्या असभ्य, अपमानास्पद आणि अपमानास्पद भाषेचा वापरही भाषिक संस्कृती आणि भारतीय लोकशाही समाजाची मोडतोड झाल्याचे सूचित करते. शिक्षणाच्या बाजारीकरणवरअंकुश ठेवण्यासाठी देशातील तरुणांनी कॉक्रोच पार्टीलापाठिंबा देत थेट दिल्लीच्या गादीला हादरवले हे वाखाणण्याजोगे आहेच परंतु आंदोलन करताना भाषा शैलीवरून सुटलेला ताबा भविष्यातील चिंता व्यक्त करणारा प्रकार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. चिंतेची गोष्ट अशी नाही की गैरवर्तन जेन जी किंवा जेन अल्फा द्वारे केले गेले.

चिंतेचा गाभा हा आहे की जनमानसात उठवल्या जाणाऱ्या शिव्या आता जनरल-जीमध्येही प्रतिकाराची नवी भाषा बनत आहेत का? अपमानास्पद शब्दांना आता धैर्य, स्वातंत्र्य, क्रांती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा नवीन समानार्थी शब्द बनवले जात आहेत का? त्याच्या दूरगामी परिणामांची चिंता कुटुंबाला, समाजाला आणि देशाने करायला हवी. खरेतर ज्या तरुणाईच्या बळकटीकरणावर आपण महासत्ता बनणार आहोत त्या तरुणाईला योग्य दिशा देण्याची गरज निर्माण झाली आहे. लोकशाहीत निषेध हा केवळ अधिकार नसून ते सामाजिक जाणिवेचे सशक्त माध्यम आहे. प्रत्येक कालखंडातील हालचाली केवळ त्यांच्या उद्दिष्टांवरूनच नव्हे तर त्यांच्या भाषेवरून आणि अभिव्यक्तीवरूनही ओळखल्या जातात. समाजशास्त्र आपल्याला सांगते की भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नाही तर ती समाजातील मूल्ये, शक्ती संबंध आणि सांस्कृतिक बदलांचा आरसा आहे. हा आरास देशाच्या सत्ताधाऱ्यांना दाखवला पाहिजे हे निश्चितपणे गरजेचे असलेतरी आपल्या मागण्या मागतानासमोरच्यावर शाब्दिक हल्ला चढवताना जीभ घसरणार नाही याची काळजी तरुणाईने घ्यायला हवी. शब्द केवळ कल्पनाच व्यक्त करत नाहीत तर ते सामाजिक शक्ती, ओळख आणि संघर्ष देखील दर्शवतात. त्यामुळे जेव्हा एखाद्या चळवळीची भाषा बदलते तेव्हा ते केवळ शब्दांमध्ये बदल होत नाही, तर ते सामाजिक संस्कृतीतील बदलांचेही द्योतक असते. आजचा जेन जी डिजिटल जगात जन्माला आलेल्या पिढीचे प्रतिनिधित्व करतो. इन्स्टाग्रामवर रील संस्कृती, लक्षात ठेवा की डिजिटल अल्गोरिदम सामान्यतः समान सामग्री पुन्हा पुन्हा दर्शवतात, जे धक्कादायक आहे तसेच खळबळ किंवा वाद निर्माण करते. हेच कारण आहे की त्याची आक्रमक आणि बेताल भाषा त्याच्या संयमित भाषेपेक्षा जास्त व्हायरल होते. आता हळूहळू सार्वजनिक जीवनातही हा ट्रेंड अनुभवायला मिळत आहे. इतिहास साक्षी आहे की प्रतिकाराची नैतिक शक्ती आपल्या भाषेच्या प्रतिष्ठेमुळे कमी होत नाही. महात्मा गांधींनी ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिले, पण अपशब्द वापरले नाहीत. डॉ.भीमराव आंबेडकर यांनी व्यवस्थेवर कठोर टीका केली, पण भाषेची प्रतिष्ठा सोडली नाही. डॉ. राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण आणि अटलबिहारी वाजपेयी यांसारख्या राजकारण्यांनी विचारांची भयंकर लढाई लढली, पण संवादाचे रुपांतर कधीच गैरवर्तनात झाले नाही. इतिहास हेही दाखवतो की जेव्हा शब्दांची प्रतिष्ठा हरवते तेव्हा चळवळही आपली नैतिक उंची गमावते. गंमत अशी आहे की आज भाषेचा दर्जा केवळ सार्वजनिक जीवनात तसेच राजकीय व्यासपीठांवरच घसरत नाही तर कुटुंबे, शाळा, विद्यापीठे, मनोरंजन उद्योग आणि इंटरनेट माध्यमे आणि अगदी संसदेलाही याचा फटका बसत आहे. सार्वजनिक व्यासपीठांवर शिवीगाळांचा ओघ वाढला, तर उद्या हीच भाषा शिक्षणाच्या मंदिरांपासून घराघरांत प्रवास करेल. भाषेचा ऱ्हास कधीच मर्यादित राहत नाही, ती सामाजिक संस्कृतीचाही एक भाग बनते. निःसंशयपणे भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे, परंतु स्वातंत्र्य आणि अव्यवस्था यात खूप फरक आहे. स्वातंत्र्याचा अर्थ असा नाही की भाषेच्या सर्व मर्यादा मोडल्या पाहिजेत. इथे अभिव्यक्तीचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकाच सार्वजनिक प्रवचनाच्या प्रतिष्ठेचे रक्षणही महत्त्वाचे आहे. आज सार्वजनिक जीवनासाठी समान भाषिक आचारसंहिता विकसित करण्याची गरज आहे. राजकीय पक्षांनी त्यांच्या समर्थकांना स्पष्ट संदेश द्यावा की विचारांचा संघर्ष मान्य आहे, परंतु व्यक्तींचा अपमान करणे कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही. शैक्षणिक संस्थांनाही अर्थपूर्ण संवादाची संस्कृती विकसित करावी लागेल. माध्यमांना भाषा आणि संवादाच्या गुणवत्तेचा जागरुक पहारा ठेवावा लागेल. त्याचबरोबर विचारवंत, साहित्यिक आणि सांस्कृतिक नेतृत्वाने हा संदेश दिला पाहिजे की भाषिक संवादाशी संबंधित संयम हे आपल्या दुर्बलतेचे प्रतीक नसून आपल्या भारतीय सभ्यतेची परिपक्वता आहे. संविधान म्हणजे केवळ शब्दांचा गठ्ठा नाही. संवादाची संस्कृती हा त्याचा आत्मा आहे. संस्कृतीची पहिली अभिव्यक्ती म्हणजे भाषा. चळवळींमध्ये किंवा राजकीय चर्चेत भाषेचा सन्मान हरवला तर लोकशाहीचा आत्माही हळूहळू बिघडतो. इतिहासाने नेहमीच हे सिद्ध केले आहे की तलवारीच्या वापरापेक्षा अंदाधुंद शब्दांच्या वापराने सभ्यता अधिक नष्ट झाली आहे. झेन-जीशी संबंधित जंतरमंतर चळवळ पालकांना देखील शिकवते की त्यांनी आपल्या मुलांना फक्त सर्वकाही देऊन आनंदी राहण्यास शिकवू नये, तर त्यांचे जीवन अशा प्रकारे तयार केले पाहिजे की ते वेळेत अपयश सहन करू शकतील. टीका स्वीकारण्यासोबतच, तुम्ही तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवून इतरांचा आदर करायलाही शिकू शकता. तरच कदाचित ही पिढी अशा आंदोलनांमध्ये भाषिक औचित्याबाबत संयम राखण्यात यशस्वी होईल.

लोकसंसद

## भारतीय क्रिकेट संघाने गाठला ६०० कसोटी टप्पा!

भारतीय संघाने श्रीलंकेच्या गॉल येथे श्रीलंकेविरुद्ध खेळवल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात श्रीलंकेवर १६५ धावांनी सहज मात करून एका ऐतिहासिक विजयाची नोंद केली. भारताच्या ९४ वर्षांच्या क्रिकेट कसोटी इतिहासातील तो ६०० वा सामना होता. या विजयामुळे भारतीय संघाचे आता १८७ विजय झाले आहेत. तर १८८ सामन्यात भारतीय संघाला पराभव पत्करावा लागला आहे. ६०० सामन्यांपैकी उर्वरित २२४ सामने अनिर्णित राहिले आहेत तर आणि एक कसोटी सामना बरोबरीत सुटला आहे. भारतीय क्रिकेट संघाच्या एकूण ६०० कसोटी सामन्यांच्या प्रत्येक १०० सामन्यांच्या टप्प्यांचे विश्लेषण केले असता भारताच्या कामगिरीत झालेली नेत्रदीपक सुधारणा स्पष्टपणे दिसून येते. पहिल्या १०० कसोटी सामन्यांपैकी भारताला अवघे १० सामने जिंकता आले तर तब्बल ४० सामन्यांत भारतीय क्रिकेट संघाला पराभव स्वीकारावा लागला होता. मात्र जसजसा काळ बदलला, तसतसा भारतीय संघ मायदेशात अजेय बनला आणि परदेशातही विजय मिळवू लागला. ५०१ ते ६०० या सर्वात अलीकडच्या टप्प्यात भारताने १०० कसोटी सामन्यांपैकी ५७ सामने जिंकून आपले जागतिक क्रिकेटमधील वर्चस्व सिद्ध केले आहे. सुरुवातीच्या काळात पराभव पत्करणारा भारतीय संघ आज जगातील सर्वात प्रबळ आणि बलाढ्य कसोटी संघांपैकी एक संघ बनला आहे. भारतीय संघ अशीच नवनवीन शिखरे सर करो आणि कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा दबदबा कायम राहो हीच सदिच्छा!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# तारकांच्या विश्वाचा महान अभ्यासक : डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर

विश्वाच्या अथांग पसाऱ्यात असंख्य तारे जन्माला येतात, तेजस्वीपणे प्रकाशतात आणि कालांतराने त्यांच्या जीवनाचा शेवट होतो. या ताऱ्यांचा जन्म, त्यांची उत्क्रांती, त्यांचे वस्तुमान आणि त्यांच्या अंतिम अवस्थेचा अभ्यास करणाऱ्या महान शास्त्रज्ञांमध्ये डॉ. सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. भारतीय वंशाचे महान खगोलभौतिकशास्त्रज्ञ असलेल्या चंद्रशेखर यांनी आपल्या गणिती प्रतिभेच्या जोरावर तारकीय उत्क्रांतीविषयीचे अनेक महत्त्वाचे प्रश्न सोडवले. त्यांच्या संशोधनामुळे आधुनिक खगोल भौतिकशास्त्राला नवी दिशा मिळाली.

डॉ.सुब्रह्मण्यन चंद्रशेखर यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९१० रोजी लाहोर येथे झाला. त्यांचे कुटुंब विद्वत्तापूर्ण आणि सांस्कृतिक वातावरणासाठी प्रसिद्ध होते. त्यांचे काका सर सी.व्ही. रामन हे जगप्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ आणि नोबेल पुरस्कार विजेते होते. अशा प्रतिभावान वातावरणाचा चंद्रशेखर यांच्या बौद्धिक जडणघडणीवर निश्चितच प्रभाव पडला. लहानपणापासूनच चंद्रशेखर यांना गणित आणि विज्ञानाची विशेष आवड होती. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी त्यांनी विज्ञानाच्या क्षेत्रात स्वतंत्र संशोधन सुरू केले. पुढील उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात गेले. तेथे ट्रिनिटी कॉलेजशी त्यांचा संबंध आला आणि त्यांनी खगोलभौतिकशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा अभ्यास सुरू केला. त्यांचे सर्वात प्रसिद्ध योगदान म्हणजे 'चंद्रशेखर मर्यादा'. ताऱ्यांचे जीवन संपल्यानंतर त्यांचे काय होते, हा त्या काळातील खगोलशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होता. १९३०मध्ये भारतातून इंग्लंडकडे समुद्रप्रवास करत असताना तरुण चंद्रशेखर यांनी या प्रश्नाचा सखोल विचार केला. क्वांटम मेकॅनिक्स, विशेष सापेक्षतावाद आणि तारकीय संरचनेचा गणिती अभ्यास यांचा उपयोग करून त्यांनी श्वेत बटू ताऱ्यांच्या कमाल वस्तुमानाची मर्यादा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या गणनेनुसार ही मर्यादा सूर्याच्या वस्तुमानाच्या सुमारे १.४४ पट आहे. याचा अर्थ एखाद्या ताऱ्याचे अंतिम वस्तुमान या मर्यादेपेक्षा कमी असेल तर तो श्वेत बटूच्या अवस्थेत स्थिर राहू शकतो; परंतु अधिक वस्तुमान असलेल्या ताऱ्यांना केवळ श्वेत बटू अवस्थेत स्थिर राहणे शक्य नसते. अशा ताऱ्यांच्या पुढील उत्क्रांतीत गुरुत्वाकर्षणामुळे अधिक गंभीर स्वरूपाचे संकुचन घडू शकते. पुढे न्यूट्रॉन तारे आणि कृष्णविवरांच्या अभ्यासाशी संबंधित आधुनिक सिद्धांत विकसित होत गेले. चंद्रशेखर यांचा हा सिद्धांत त्यांच्या काळात सर्वांनी सहज स्वीकारला नाही. प्रख्यात ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ सर आर्थर एडिंग्टन यांनी त्यांच्या निष्कर्षांवर तीव्र आक्षेप घेतला. त्यामुळे त्यांच्या संशोधनाला सुरुवातीला मोठा विरोध सहन करावा लागला. मात्र त्यांनी आपले संशोधन सोडले नाही. त्यांनी आपले गणिती विश्लेषण पुढे नेले. १९३९ मध्ये त्यांनी An Introduction to the Study of Stellar Structure हे महत्त्वपूर्ण पुस्तक प्रकाशित केले. तारकीय संरचना आणि उत्क्रांतीच्या अभ्यासातील हे पुस्तक पुढील संशोधनासाठी अत्यंत प्रभावी ठरले. सुरुवातीला त्यांच्या सिद्धांतावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले, परंतु पुढील दशकांमध्ये खगोलभौतिकशास्त्राच्या प्रगतीबरोबर त्यांच्या गणिती निष्कर्षांचे महत्त्व अधिकाधिक स्पष्ट होत गेले. ताऱ्यांची रचना, त्यांचे आयुष्य, ऊर्जा निर्माण करण्याची प्रक्रिया आणि ताऱ्यांच्या अंतिम अवस्थांचा अभ्यास करण्यासाठी चंद्रशेखर यांनी केलेले योगदान अत्यंत व्यापक होते. त्यांनी विकिरण स्थानांतरण, तारकीय गतिशास्त्र, कृष्णविवरांचे गणिती सिद्धांत आणि द्रवगतिकी अशा अनेक क्षेत्रांत महत्त्वपूर्ण काम केले. त्यांच्या प्रदीर्घ आणि मूलभूत वैज्ञानिक योगदानाची अखेर जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली. १९८३मध्ये त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार देण्यात आला. विल्यम ए. फाउलर यांच्यासोबत त्यांना हा पुरस्कार मिळाला. डॉ. चंद्रशेखर यांनी आपले संपूर्ण आयुष्य संशोधन, अध्यापन आणि ज्ञाननिर्मितीसाठी वाहून घेतले. २१ ऑगस्ट १९९५ रोजी शिकागो येथे त्यांचे निधन झाले.

- श्याम ठाणेदार

# अतिरिक्त दरवाढ मागे घ्या

● एसटीच्या शुल्काविरोधात कोकणवासी आक्रमक

● मुख्य मागण्यांसाठी गृहराज्यमंत्र्यांना निवेदन

। मुंबई । प्रतिनिधी ।

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाने ग्रुप बुकिंगवर लागू केलेल्या अतिरिक्त शुल्काविरोधात कोकणवासीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या दरवाढीच्या निषेधार्थ कोकण रहिवासी समाज संघ, पुणे व स्वराज्य कोकण संघटनेच्या वतीने राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची पुण्यात प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सुपूर्द करण्यात आले. या भेटीदरम्यान कोकणवासीयांच्या विविध समस्यांवर आणि एसटी प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात कोकणवासीयांच्या हितासाठी महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत. एसटी ग्रुप बुकिंगवर लागू केलेली ३० टक्के अतिरिक्त रक्कम तात्काळ कमी किंवा रद्द करण्यात यावी. यावर्षी आधीच झालेली १३ टक्के तिकीट दरवाढ लक्षात घेता प्रवाशांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार टाकू नये. तसेच दोन महिने आधी बुकिंग करणाऱ्या प्रवाशांना अचानक वाढीव दर लागू करू नयेत, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. यासोबतच, गणेशोत्सवासाठी पुणे व पिंपरी-चिंचवड येथून कोकणातील विविध तालुक्यांसाठी ज्यादा एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणीही शिष्टमंडळाने केली.

याबाबत बोलताना कोकण रहिवासी समाज संघ व स्वराज्य कोकण संघटनेचे अध्यक्ष प्रकाश यादव म्हणाले की, ग्रुप बुकिंगमुळे एसटी महामंडळाला एकाच वेळी मोठ्या संख्येने निश्चित प्रवासी मिळतात. यामुळे प्रशासनावरील ताण कमी होतो आणि आगारांमधील गर्दीचे नियोजन करणे सुलभ होते. त्यामुळे अशा बुकिंगला प्रोत्साहन देण्याऐवजी अचानक अतिरिक्त शुल्क आकारणे हे प्रवाशांच्या हिताचे नाही. कोकणवासीयांच्या या निवेदनाची गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी गंभीर दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला.

> “ महामंडळाने केवळ नफ्याचा विचार न करता चाकरमान्यांच्या आर्थिक परिस्थितीला प्राधान्य द्यायला हवे.
> – प्रकाश यादव, अध्यक्ष, स्वराज्य कोकण संघटना ”

‘‘गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांवर आणि प्रवाशांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, यासाठी लवकरच एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन कोकणातील नागरिकांना योग्य तो दिलासा दिला जाईल,’’ असे स्पष्ट आश्वासन कदम यांनी यावेळी दिले.

## प्रवाशांची दुहेरी कोंडी

पुण्यातून कोकणासाठी थेट रेल्वे नसल्याने चाकरमान्यांना आधी मुंबई-पनवेल गाठावे लागते. त्यातच एकीकडे एसटीची ग्रुप बुकिंग दरवाढ आणि दुसरीकडे पुण्यातून सुटणाऱ्या अपुऱ्या एसटी फेऱ्या, अशा दुहेरी कोंडीत प्रवासी सापडला आहे. त्यामुळे या रास्त मागण्यांची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी कोकणवासीयांची आग्रही मागणी आहे.

पान ३ वरून

## १२ सप्टेंबरला राष्ट्रीय लोकअदालत

घरपट्टी-पाणीपट्टी, वीज वितरण, दूरसंचार, बँका, पतसंस्था व अन्य वित्तीय संस्थांच्या थकबाकीशी संबंधित वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीत कोणतीही फी आकारली जात नाही. येथे होणारा निवाडा अंतिम व बंधनकारक असून त्याविरुद्ध अपील करता येत नाही. प्रकरणे जलदगतीने निकाली निघत असल्याने वेळ, पैसा आणि श्रमाची बचत होते. तसेच निकाली निघालेल्या प्रकरणांतील नियमानुसार भरलेली न्यायालयीन फी परत मिळते.

दरम्यान, ९ मे २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीत रायगड जिल्ह्यातील ४ हजार २६७ प्रकरणे निकाली काढण्यात आली होती. त्यामुळे पुन्हा मिळालेल्या या संधीचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नऊ मच्छिमारांची सुखरुप सुटका

‘विनायक’ (नोंदणी क्रमांक **IND-MH-MM-07-3350**) ही मासेमारी बोट १९ ऑगस्ट रोजी जेएनपीटी वाहतूक मार्गाच्या बाहेरील समुद्र परिसरात मासेमारीसाठी गेली होती. दुपारच्या सुमारास बोटीच्या इंजिन कक्षात अचानक पाणी शिरण्यास सुरुवात झाली. काही वेळातच पाण्याचे प्रमाण वाढल्याने इंजिनमध्ये बिघाड झाला आणि ते बंद पडले.

इंजिन बंद पडल्याने बोटीवरील मच्छिमारांमध्ये घबराट निर्माण झाली. समुद्रातील लाटांचा जोर वाढत असताना बोट हेलकावे खाऊ लागल्याने बुडण्याचा धोका निर्माण झाला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मदतीसाठी संदेश देण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच येलोगेट पोलिसांचे पथक तातडीने बचावकार्यासाठी रवाना झाले. यावेळी स्थानिक मच्छिमारांचीही मदत घेण्यात आली. ‘महाशांती दीप’ (नोंदणी क्रमांक **IND-MH-MM-07-246**) या स्थानिक मासेमारी बोटीने संकटात सापडलेल्या ‘विनायक’ला सुरक्षितपणे ओढत किनाऱ्याच्या दिशेने आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

जेएनपीटी वाहतूक मार्ग हा मोठ्या मालवाहू जहाजांची सतत ये-जा असलेला संवेदनशील सागरी मार्ग आहे. त्यामुळे अशा परिसरात एखादी बोट संकटात सापडल्यास वेळेत बचावकार्य होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.बचावकार्यानंतर दुपारी सुमारे २.१५ वाजता नऊही मच्छिमारांना भाऊचा धक्का येथे सुरक्षितपणे आणण्यात आले आणि त्यांना येलोगेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.समुद्रात जाण्यापूर्वी हवामान विभाग तसेच समुद्री हवामान व लाटांबाबतच्या इशाऱ्यांची माहिती घेणेही मच्छिमारांसाठी महत्त्वाचे आहे. वेळीच मिळालेली मदत, येलोगेट पोलिसांची तत्परता आणि स्थानिक मच्छिमारांचे सहकार्य यामुळे समुद्राच्या मध्यभागी अडकलेल्या नऊ मच्छिमारांचे प्राण वाचले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

## जेएनपीएत ३०० कोटींच्या मेथाम्फेटामाइनचा पर्दाफाश

एका गोणीमध्ये संशयास्पद पदार्थ आढळून आला.

तातडीने मोबाईल फॉरेन्सिक विज्ञान प्रयोगशाळेच्या पथकाला घटनास्थळी बोलावण्यात आले. प्राथमिक चाचणीत हा पदार्थ उच्च दर्जाचा मेथाम्फेटामाइन असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर डीआरआयने ५५ किलो अमली पदार्थ जप्त केला.

**सूत्रधार कोण? जाळे किती मोठे?**

जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाचा स्रोत कुठे आहे, तो जेएनपीएपर्यंत कसा पोहोचला, त्यामागे देशांतर्गत कोणते नेटवर्क कार्यरत आहे आणि हा साठा नेमका कोणत्या देशात पाठविण्यात येणार होता, याचा तपास सुरू आहे. तसेच या आंतरराष्ट्रीय तस्करीच्या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, तस्करीचे सूत्रधार भारतात कोणाच्या मदतीने काम करत होते, याचाही तपास तपास यंत्रणा करीत आहेत.

**जेएनपीएच्या सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह**

जेएनपीए हे देशातील महत्त्वाचे आयात-निर्यात केंद्र आहे. दररोज हजारो कंटेनरची ये-जा होत असलेल्या या संवेदनशील परिसरातून तब्बल ३०० कोटींच्या अमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न उघड झाल्याने सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे.

मक्याच्या गोणीआडून कोट्यवधींचा अमली पदार्थांचा खेळ सुरू होता; मात्र डीआरआयच्या गुप्त माहितीने हा डाव उधळला. आता या कारवाईतून तस्करीचे संपूर्ण आंतरराष्ट्रीय जाळे उघडकीस येते का आणि या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार तपास यंत्रणांच्या हाती लागतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गणेशमूर्ती विसर्जनाचे ‘विघ्न’ दूर

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयात अर्ज करून या आदेशाबाबत स्पष्टता देण्याची विनंती केली. त्यानंतर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने गुरुवारी याबाबत स्पष्टीकरण दिले. त्यामुळे मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत तूर्त दिलासा मिळाला असला तरी पर्यावरणाच्या दृष्टीने पीओपी मूर्तींच्या वापराचा प्रश्न अद्याप न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या प्रतीक्षेत आहे.

## चवदार तळ्याच्या विकासकामांना गती देणार : मंत्री संजय शिरसाट

मूलभूत सुविधांची पूर्तता करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चवदार तळे सत्याग्रहाने सामाजिक समतेच्या लढ्याला ऐतिहासिक दिशा दिली. त्यामुळे २०२७ हे शताब्दी वर्ष या ऐतिहासिक वारशाला अधिक भव्य स्वरूप देणारे ठरावे, यासाठी शासनस्तरावर आवश्यक ती कार्यवाही वेगाने करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## चाकरमान्यांच्या खिशाला कात्री!

त्यानंतरही त्यांना वेळेवर सेवा द्यायची नाही, ही व्यवस्था नेमकी कोणासाठी? असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित होत आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाकडून विशेष गाड्या सोडल्या जातात. यंदा मध्य रेल्वेने २४६, तर पश्चिम रेल्वेने ६० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. मात्र, प्रवासी संघटनांनी तब्बल ४०० विशेष फेऱ्यांची मागणी केली आहे. त्यामुळे उपलब्ध गाड्यांची संख्या आणि प्रवाशांची प्रचंड मागणी यामध्ये मोठी तफावत असल्याचे चित्र आहे. विशेष गाड्यांच्या नावाखाली प्रवाशांच्या खिशावर मोठा भार पडत आहे. मुंबई ते खेड मार्गाचे उदाहरण घेतल्यास नियमित गाडीच्या शयनयानाचे भाडे २०५ रुपये आहे. याच मार्गासाठी विशेष गाडीच्या शयनयानाचे भाडे तब्बल ४०० रुपये आकारले जाणार आहे. एसी तृतीय श्रेणीचे नियमित भाडे ५२० रुपये असताना विशेष गाडीसाठी १ हजार ७० रुपये, तर एसी द्वितीय श्रेणीसाठी नियमित ७२५ रुपयांऐवजी तब्बल १ हजार ४७० रुपये मोजावे लागणार आहेत.

**वाढीव भाड्यासोबत किमान ५०० किलोमीटरची अट**

रेल्वे बोर्डाने २०१५ मध्ये विशेष गाड्यांसाठी तयार केलेल्या नियमांनुसार वाढीव भाड्याची तरतूद आहे. त्यात प्रत्यक्ष प्रवास ५०० किलोमीटरपेक्षा कमी असला तरी किमान ५०० किलोमीटरचे भाडे आकारले जाते. त्यामुळे २०० ते ३०० किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या नियमाचा मोठा फटका बसतो. विशेष गाड्यांसाठी आधीच वाढीव भाडे आकारले जात असताना किमान अंतराची अटही लावणे अन्यायकारक असल्याचे प्रवासी संघटनांचे म्हणणे आहे. त्यामुळे ही अट रद्द करण्याची मागणी होत आहे.

## नकाशात ‘सीआरझेड’, प्रत्यक्षात कांदळवन

केलेल्या तक्रारीनंतर स्थळ पाहणी करण्यात आली असून,



त्यावेळी पंचनामा झाल्याचेही तक्रारदारांचे म्हणणे आहे.

जीपीएस छायाचित्रे, स्थळ पाहणी अहवाल आणि अन्य पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करत ग्रामस्थांनी प्रत्यक्ष कांदळवन असल्यास संबंधित क्षेत्राचे सीआरझेड-एआय म्हणून पुनर्वर्गीकरण करावे, तसेच लागू असल्यास ५० मीटर कांदळवन संरक्षक क्षेत्राची नोंद सीझेडएमपी नकाशात करावी, अशी मागणी केली आहे.

या प्रकरणाची संयुक्त पाहणी करून उपलब्ध पंचनामे व पुराव्यांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होऊन अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित क्षेत्रात झाडतोड, भराव, उत्खनन, बांधकाम किंवा अन्य विकासकामांना प्रतिबंध करावा, अशी मागणी जिल्हाधिकारी, वन विभाग आणि कांदळवन कक्षाकडे करण्यात आली आहे.

निडी गावाच्या पूर्वेकडील तसेच निडी मिठेखार बंदराच्या आतील भागातील कांदळवन क्षेत्राबाबतही ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. या परिसरातील कांदळवनावर हस्तक्षेप, भराव अथवा झाडांचे नुकसान होत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. हा परिसर जेएसडब्ल्यू साळाव कंपनीच्या नावावरील सात-बारा उताऱ्याशी संबंधित असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला असून, त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.साळाव खाडीकिनारी सुमारे आठ किलोमीटर परिसरात रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली होत असल्याच्या चर्चा स्थानिकांमध्ये आहेत. चारचाकी वाहनांतून व्यक्तींची ये-जा तसेच भाडोत्री मजुरांकडून कांदळवन तोडले जात असल्याचे आरोपही ग्रामस्थांकडून केले जात आहेत. हे आरोप अद्याप स्वतंत्र चौकशीत सिद्ध झालेले नसून, संबंधित यंत्रणांनी त्यांची सत्यता तपासावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

तक्रारदारांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या ६ ऑक्टोबर २००५ रोजीच्या आदेशाचाही दाखला दिला आहे. कांदळवन तोड, भराव आणि नुकसान याबाबत असलेल्या न्यायालयीन निर्बंधांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी त्यांची मागणी आहे. पंचनाम्यात कांदळवन दिसत असेल, तर सरकारी नकाशात ते का दिसत नाही? आणि प्रत्यक्ष कांदळवन असेल तर त्याचे संरक्षण करण्यासाठी शासनाची पुढची ठोस कारवाई काय? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. आता एमसीझेडएमए पर्यावरण विभाग, वन विभाग आणि रायगड जिल्हा प्रशासन नकाशा आणि प्रत्यक्ष वास्तवातील या कथित विसंगतीची कशी दखल घेते, तसेच जेएसडब्ल्यू साळाव परिसरातील आरोपांची चौकशी होते का, याकडे रायगडचे लक्ष लागले आहे.

## नाशिकच्या घरफोडीचे सूत्रधार आरसीएफमध्ये?

आरसीएफमध्ये कंत्राटी कर्मचारी असल्याची माहिती आहे. आरसीएफ कर्मचारी वसाहतीमध्ये राहात असलेल्या नातेवाईकांकडे हे दोघेजण लपून बसल्याचे पोलिसांनी सांगितले. नाशिक आणि अलिबाग पोलिसांच्या संयुक्त कारवाईमुळे घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे मजरे जांभुळपाडा, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | सं..नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १)श्री.अनंत गणपत म्हसके.<br>२) श्रीम. गिता तुकाराम मोरे.<br>३)श्री.महेंद्र रामचंद्र घाडगे .<br>४) श्री.शानशाहा उस्मान दोडामनी.<br>५)श्री.गणेश आत्माराम पाटील.<br>६)श्रीम.शालीनी महादु बोडके.<br>७) श्री.तुकाराम मधुकर बोडके. | २२६ | २-५४-५०<br>सदर जमीनीपैकी लिहून देणार यांचा संपुर्ण अविभक्त हीस्सा दिला आहे | ०-४६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणातीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २१/०८/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोडसदन ऑफिस नं. ७
पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री प्रितेश प्रभाकर मोरे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे आर. प्रति | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ४३ | १/ड | ०.१०.९० | १.०१ |

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा बोजा, हक्क, हितसंबंध, अधिकार, कुळ वहिवाट, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारस हक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदर मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करण्यात येईल. मुदतबाह्य हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कार्यालय पत्ता
१०३,पहिला मजला,पांडुरंग धाम,
रेल्वे गेट जवळ, नेरळ, ता. कर्जत,
जि.रायगड मो.नं.७७९८४३३८८८

सही/-
**ॲड. कैलास अनंत बासरे**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशीलांनी मौजे झाप ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे- झाप ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.शरद नारायण ठोंबरे | ३०५ | ०-१५-९० | ०-२८ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्युपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली-सुधागड सही/-
दिनांक २०/०८/२०२६ **श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु. पो. नविन पनवेल ता.पनवेल जि. रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८



सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | नावडे ११६ | ८५/३७ | २६/२<br>**एकूण क्षेत्र** | ०-४६-८<br>**०-४६-८** | ४०० चौ.मी. | नोड-खारघर, भूखंड क्र. १०, सेक्टर-४३, क्षेत्र-४०० चौ.मी. | **कै. जगन्नाथ हरिभाऊ पाटील व सिताबाई जगन्नाथ पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) संजय जगन्नाथ पाटील<br>२) राजेश जगन्नाथ पाटील<br>३) किशोर जगन्नाथ पाटील<br>४) वनिता जगन्नाथ पाटील उर्फ वनिता ज्ञानेश्वर पाटील | – |
| २ | द्रोणागिरी १३२ | नवघर ४१५<br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br><br>मुठेखार २०/८५<br>शेमटीखार १०/११-१२<br><br><br>एकूण संपादित क्षेत्र | ३८२/१अ<br>३७२/७ब<br>३८६/७क<br>३५६/९<br>३५८/४<br>३६२/१अ<br>३६७/६अ<br>३५९/५ब<br>३७१/२<br>३७३/३ब<br>३७४/५ब<br>३८४/२<br>३७६/४<br>३७९/१०ब<br>७/३-क-२<br>७/६<br>१/१<br>३/१अ | ०-१२-०<br>०-०५-०<br>०-१५-०<br>०-०२-८<br>०-०८-६<br>०-२५-४<br>०-१६-२<br>०-१९-८<br>०-१२-६<br>०-०५-०<br>०-०९-६<br>०-१२-९<br>०-११-९<br>०-०२-५<br>०-८४-५<br>०-०८-१<br>०-०७-६<br>०-१६-७<br>२-७६-३ | २४०० चौ.मी. | भूखंड क्र.०५, सेक्टर-५८, क्षेत्र-२४०० चौ.मी. | १. श्री. हरिश्चंद्र विठ्ठल पाटील<br>२. सौ. यमुना अमृत पालकर<br>३. सौ. चांगुना सुरेश ठाकूर<br>४. सौ. रंजना शरद म्हात्रे<br>५. श्रीमती वनिता शिवदास पाटील<br>६. श्रीमती पुजा शिवदास पाटील<br>७. श्रीमती भारती दशरथ पाटील<br>८. श्री. निखिल दशरथ पाटील<br>९. श्री. अक्षय दशरथ पाटील<br>१०. श्रीमती प्रियंका दशरथ पाटील उर्फ प्रियंका आशिष भगत<br>११. श्रीमती सुवर्णा चंद्रकांत पाटील<br>१२. श्रीमती स्मिता नितिन ठाकूर<br>१३. श्री. निशांत चंद्रकांत पाटील<br>१४. श्री. कुणाल चंद्रकांत पाटील<br>१५. श्रीमती सावित्री रामनाथ पाटील<br>१६. श्री. रुपेश रामनाथ पाटील<br>१७. सौ. अर्चना ललित पाटील उर्फ अर्चना रामनाथ पाटील<br>१८. श्री. विनायक रामनाथ पाटील | निरंक |
| ३ | रोडपाली | ५० | ५१/२ | ०-०२-३ | प्रत्येकी ४० चौ.मी. | भूखंड क्र. ७२/१, सेक्टर-१६ई, क्षेत्र-४० चौ.मी. कळंबोली नोड | कै. सखुबाई चिंध्या घरत (मयत) यांचे वारस - श्रीमती. सिध्दी संदीप तांडेल | निरंक |
| ४ | कामोठे ६५९ | ३८६D पनवेल<br><br><br><br><br>२१६ पनवेल<br>३८६ पनवेल | ७०६/पै<br>७०८/२अ<br>६९८/७पै<br>६९८/३<br>१२४/२<br>३३४<br>६१० | ०-६२-७<br>०-२९-६<br>०-२७-६<br>०-०८-३<br>०-७५-१<br>०-११-०<br>०-२२-३ | १०५० चौ.मी. | भूखंड क्र. ९७+९८+९९, सेक्टर-१७, क्षेत्र-१०५० चौ.मी. पनवेल नोड | कै. रमाबाई आत्माराम आटवणे (मयत) यांचे वारस :<br>१) कै. पुरुषोत्तम आत्माराम आटवणे (मयत) व कै. उषा पुरुषोत्तम आटवणे (मयत) यांचे वारस<br>१.१) श्री. सागर पुरुषोत्तम आटवणे,<br>१.२) श्रीमती. नंदिनी सचिन शेंडे, १.३) श्रीमती. स्वाती श्रीकांत तिपरादी,<br>२) कै. मनोहर आत्माराम आटवणे (मयत) व कै. मनिषा मनोहर आटवणे (मयत) यांचे वारस<br>२.१) श्री. विशाल मनोहर आटवणे,<br>२.२) श्री. संजिव मनोहर आटवणे, २.३) श्रीमती. सविता किशोर हल्याळ,<br>३) कै. मधुकर आत्माराम आटवणे (मयत) यांचे वारस<br>३.१) श्रीमती. सरिता आत्माराम आटवणे,<br>३.२) श्री. चैतन्य आत्माराम आटवणे,<br>३.३) श्री. विवेक आत्माराम आटवणे,<br>४) कै. सुमन दयानंद वेळमल्ली (मयत) यांचे वारस<br>४.१) श्रीमती. विद्या किशोर ठोकडे<br>५) श्री. शरद आत्माराम आटवणे | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१९६/२०२६-२७

# रोहा-बारशेत मार्गावर जीवघेणा प्रवास

**|| नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर || सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

**| चणेरा | प्रतिनिधी |**

विकासाच्या घोषणा आणि निधीच्या आकड्यांमध्ये ग्रामीण भागाचा विकास कुठे आहे, असा संतप्त सवाल आता रोहा तालुक्यातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. रोहा ते बारशेत हा अनेक गावांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग सध्या अक्षरशः जीवघेणा बनला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, रोहा ते बारशेत मार्गावर तांबडी, निवी ठाकूरवाडी, सवाणे, गौळवाडी, म्हसाडी, बारशेत, वाली यांसह अनेक गावांची



वाहतूक अवलंबून आहे. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, एसटी आणि अन्य वाहने याच मार्गाने नियमित ये-जा करतात. त्यामुळे हा रस्ता ग्रामीण भागासाठी जीवनवाहिनी असताना त्याची अवस्था मात्र, अत्यंत दयनीय झाली आहे.

या मार्गावर काही दिवसांपूर्वी तब्बल दोन ते तीन फूट खोल आणि मोठ्या आकाराचा खड्डा पडला आहे. विशेष म्हणजे या खड्ड्याच्या दोन्ही बाजूंनी रस्त्याची अवस्था धोकादायक झाली असून मोठमोठे दगडवर आले आहेत. रात्रीच्या अंधारात हा खड्डा वाहनचालकांच्या लक्षात न आल्यास दुचाकीस्वार किंवा चारचाकी वाहन त्यात आदळून गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने आणखी किती खोल खड्डा पडण्याची आणि एखाद्याचा जीव जाण्याची वाट पाहायची? असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत.

गौळवाडी गावासमोर तर परिस्थिती अधिकच गंभीर आहे. रस्त्यावरील मोठी मोरी खचली असून, तिच्या दोन्ही बाजूंना दोन ते तीन फूट खोल मोठमोठे होल पडले आहेत. वाहनचालकांनी थोडीशी चूक केली तरी वाहन थेट या खड्ड्यांमध्ये जाण्याची शक्यता आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी हा रस्ता अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे.

> रस्त्याच्या स्थितीची माहिती आहे. गौळवाडीसमोरील मोरी खचल्याची माहिती नाही. माहिती मिळताच तातडीने संबंधितांना दुरुस्तीचे आदेश देणार आहे. तसेच पावसाळा संपल्यानंतर रस्त्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.
>
> – अरुण पाटील
> सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता

एखादी दुचाकी या खड्ड्यात गेल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्त्याच्या कडेला साईडपट्ट्या नाहीत, अनेक ठिकाणी डांबर पूर्णपणे उखडले आहे आणि मोठमोठे दगड रस्त्यावर आले आहेत. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट झाली असून वाहनचालकांना अक्षरशः कसरत करत मार्ग काढावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली आहे का? केली असेल तर ही परिस्थिती अद्याप का कायम आहे? असा थेट सवाल आता ग्रामस्थ करत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन तातडीने उपाययोजना करावी. एखादा मोठा अपघात घडल्यानंतर पंचनामा, पाहणी आणि आश्वासन देण्यापूर्वीच प्रशासन खडबडून जागे होणे गरजेचे आहे. नागरिकांचा जीव गेल्यानंतर रस्ता दुरुस्त करण्यापेक्षा, जीव वाचवण्यासाठी रस्ता आजच दुरुस्त करा! अशी संतप्त मागणी रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातून होत आहे.

---

## नाईक-अंतुले महाविद्यालयात सद्‌भावना दिवस साजरा

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

विविधतेतून एकता हा भारतीयांचा कणा आहे. हा देश विविध धर्म, पंथ, जात, भाषा, वंश, प्रदेशाने नटलेला आहे. या विविधतेतून एकतेची, बंधुभावाची, भावनिक ऐक्य, सामाजिक एकोपा या देशात निरंतर प्रवाही रहावा म्हणून या देशाचे सर्वात तरुण माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त कोकण उन्नती मित्र मंडळ मुंबईच्या बॅरिस्टर ए. आर. अंतुले संस्थापित वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाकडून माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त देशभर संपन्न होत असलेल्या सद्भावना दिनाचे आयोजन



करण्यात आले.

महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी वर्गाने सामाजिक एकोपा, शांततापूर्ण संवाद, हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून संविधानिक मार्गाने प्रश्न सोडवून आपल्यामध्ये सद्भाव नांदावा यासाठी सद्भावना शपथ घेतली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे, प्रा. रायप्पा माशाळे, डॉ. एम. एच. सिद्दीकी, डॉ. एस. यु. बेंद्रे, प्रा. यशवंत बंदरकर, डॉ. सुरेश दुंडे प्रा. मयुर बडे, डॉ. तुषार उमासरे, प्रा. राजेंद्र हालोर, प्रा.सलमा तांबोळी, प्रा.अतिका नजिरी, प्रा. कांचन पवार, प्रा. उमेमा दफेदार, प्रा. शिल्पा बोराना तसेच शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. रायप्पा माशाळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांना व्याकरण पुस्तके वाटप

**आगरदांडा :** विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासक्रमातील शिक्षणासोबतच इंग्रजी भाषेचा नियमित सराव करून तिचा आत्मविश्वासाने वापर करावा, असे प्रतिपादन सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले यांनी मुरुड जंजिरा नगरपरिषद मराठी शाळा क्रमांक १ मधील विद्यार्थ्यांना इंग्रजी व्याकरणाचे पुस्तके वाटप कार्यक्रमावेळी केले. यावेळी मुरुड मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, राजेश भोईर, उत्कृषा रणदिवे, अविनाश ठाकूर, सुनील पवार, कविता मकु, शिवानी रणदिवे, अनुष्का डोलकुलकर, प्रचिती गुंजाळ व विद्यार्थी उपस्थित होते. मनोहर बैल यांनी १ ते ८ वी च्या ९३ विद्यार्थीना इंग्रजी व्याकरणाच्या पुस्तकांचे वाटप केले आहे.

## खाडीतील गाळ काढण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मागील वर्षापासून मुरुडच्या एकदरा-मुरुड खाडीमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून मासेमारी हंगाम सुरू होण्यापूर्वी खाडीतील गाळ काढण्यात यावा. याबाबत मुरुडच्या जयभवानी मच्छिमार संस्था, सागर कन्या मच्छिमार संस्था व एकद-यातील हनुमान मच्छिमार संस्था व माहेश्वरी विविध मच्छिमार संस्थेतर्फे तहसीलदार आदेश डफळ यांना एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे. यंदा मच्छिमारांचा पावसाळी बंदी कालावधी १५ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्यानंतर मासेमारी हंगाम सुरु होणार आहे. एकदरा-मुरुडखाडीमध्येकेंद्रशासन व महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत ग्रोयन्स बंधारा व खाडीतील गाळ काढणे या कामाला मंजुरी असून सदर काम हा ग्रोयन्स बंधाऱ्याचे चालू केले होते. परंतु काम अपूर्ण असल्यामुळे खाडीमध्ये पावसाळ्यात प्रवाहामुळे मोठ्या प्रमाणात खाडीच्या चॅनलमध्ये गाळ साचला आहे. खाडीच्या चॅनलमध्ये मासेमारी बोटीला अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी खाडी क्षेत्रातील गाळ काढणे तातडीने गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी मुरुडच्या जयभवानी मच्छिमार संस्थेचे चेअरमन प्रकाश सरपाटील, सागर कन्या मच्छिमार संस्थेचे चेअरमन मनोहर बैले, पांडुरंग आगरकर, जगन्नाथ वाघरे, महेंद्र गार्डी, मनोहर मकू, मंगेश पाटील, अरुण मढवी, सुरेंद्र मकू उपस्थित होते.

---

## लोखंडी पाईप नव्याने बसवण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर उल्हास नदीवर दहिवली मालेगाव येथे पूल आहे. या पुलावरून यावर्षी तीनवेळा महापुराची पाणी गेले आहे. महापुराच्या पाण्यासोबत लाकडे ओंडके कचरा वाहून येत असतो आणि त्या कचऱ्यासोबत या पुलाच्या रेलींगसाठी बसवलेले लोखंडी पाईपांचे रेलिंग वाहून गेले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने या पुलाचे वाहून गेलेले रेलींग आणि लोखंडी पाईप नव्याने बसवण्यात यावेत अशी मागणी केली.

नेरळ-दहिवली पुलावरील नादुरुस्त झालेल्या लोखंडी रेलिंग तसेच नेरळ-कळंब-कर्जत-खांडपे



या मार्गावरील खराब रस्त्याच्या समस्ये बाबत मनसेचे वतीने कर्जत येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय कार्यालयात जाऊन भेट दिली. यशवंत भवारे यांनी या बाबत आक्रमक भूमिका घेत सातत्याने पुलाच्या विभाग दुर्लक्ष करीत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली तसेच उपअभियंता यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

## ई-घंटागाड्यांना गंज चढला

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन सुधारावे आणि स्वच्छतेला गती मिळावी, यासाठी रायगड जिल्हा परिषदेने १५ व्या वित्त आयोग व नावीन्यपूर्ण योजनेतून जानेवारी २०२५ सालात श्रीवर्धन तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींना इलेक्ट्रॉनिक घंटागाड्या (ई-रिक्षा) पुरवल्या. मात्र, तालुक्याची डोंगराळ आणि चढउताराची भौगोलिक परिस्थिती लक्षात न घेताच या गाड्या दिल्यामुळे आता वापराविना गाड्यांना अखेर गंज चढला आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील



रानवली, भोस्ते, वाळवटी, शेखाडी आणि बोर्लीपंचतन या पाच ग्रामपंचायतींच्या कचरा डेपोच्या जागा डोंगरावर किंवा चढउताराच्या ठिकाणी आहेत. वजनाने हलक्या असलेल्या या तीनचाकी ई-रिक्षा कचऱ्याने भरल्यानंतर चढवावर योग्य वेगाने चढू शकत नाहीत. चढावावर नेल्यास गाडी पलटी होऊन अपघाताचा गंभीर धोका निर्माण होतो. या कारणास्तव चालकांना या गाड्या न वापरता पुन्हा ग्रामपंचायत आवारात आणून उभ्या कराव्या लागत आहेत.

> वजनाने हलकी असलेली तीनचाकी रिक्षा चढावावर पलटी होऊ शकते. रानवली ग्रामपंचायतीचे डंपिंग ग्राउंड चढावावर आहे, तिथे ई-घंटागाडी जाऊ शकत नाही. आम्ही हा धोका पत्करू शकत नाही.
>
> – सुरेश मांडवकर.
> सरपंच, रानवली ग्रामपंचायत.

या ई-घंटागाड्यांची मागणी ग्रामपंचायतींनी केली नसतानाही जिल्हा परिषदेने त्या पाठवून दिल्या. गाड्यांसाठी आवश्यक असणारी बॅटरी चार्जिंग सुविधा, दुरुस्ती, कचरा संकलनाची पुरेशी जागा आणि देखभाल-दुरुस्तीची साधने ग्रामपंचायतींकडे उपलब्ध नाहीत. जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतींमधील समन्वयाच्या अभावामुळे या ई-रिक्षा सध्या केवळ 'शोभेची वस्तू' ठरल्या आहेत.

---

## कर्जत विधानसभा मतदार संघात मतदार यादी पुनरीक्षणाचा पहिला टप्पा पूर्ण

**| नेरळ | प्रतिनिधी |**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार कर्जत विधानसभा मतदार संघात राबविल्या जाणाऱ्या सखोल मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाचा पहिला टप्पा १७ ऑगस्ट २०२६ रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. उपविभागीय अधिकारी कर्जत कार्यालयाकडून १८ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवेदनाद्वारे याबाबतची संपूर्ण आकडेवारी आणि पुढील कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

कर्जत विधानसभा मतदार संघात पुनरीक्षणापूर्वी एकूण ३,१९,३३७ मतदार नोंदणीकृत होते. यापैकी एकूण २,५७,५५२ मतदारांची गणना प्रपत्रे भरून प्राप्त झाली आहेत. प्राप्त झालेल्या प्रपत्रांमध्ये २,५६,२४४ अर्ज हे ऑफलाइन पद्धतीने, तर १,३०८ अर्ज ऑनलाइन पद्धतीने प्राप्त झाले आहेत. तसेच, १,०३,९५० मतदारांचे सेल्फ मॅपिंग आणि १,३८,०९८ मतदारांचे प्रोव्हिजनी मॅपिंग पूर्ण झाले असून १५,९०४ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी आहे. दुसरीकडे, एकूण ६१,८८५ मतदारांची गणना प्रपत्रे प्राप्त झालेली नाहीत. यामध्ये पाहणीअंती १९,८४९ मयत मतदार, २७,३७४ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, ८,७०६ दुबार नोंदी असण-रे मतदार, ५,८४८ अनुपस्थित मतदार आणि १०८ इतर कारणांमुळे प्रपत्र न मिळालेल्या मतदारांचा समावेश आहे.

पडताळणीबाबत माहिती देताना प्रशासनाने सांगितले की, ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदारांच्या एकूण ३,५५१ संख्येकी १,१७४ मतदारांची प्रत्यक्ष पडताळणी झाली आहे, तर २,३७७ नोंदी अनकलेक्टेबल ठरल्या आहेत. त्याचप्रमाणे उद्ध्व वर्गवारीतील ११,५३१ पैकी ४,६९४ आणि इडब्ल्यू वर्गवारीतील ४,६१४ पैकी १,२७८ मतदारांची पडताळणी पूर्ण झाली आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार मतदार यादीचा पुढील टप्पा हा २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल, २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिक आपले दावे व हरकती दाखल करू शकतील, २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ प्राप्त झालेल्या सर्व दावे व हरकतींचा निपटारा केला जाईल.

## पनवेलमध्ये 'निर्भय मॉर्निंग वॉक'चे आयोजन



**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पनवेल शाखेच्या वतीने डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १३ व्या शहीद दिनानिमित्त गुरुवारी 'निर्भय मॉर्निंग वॉक'चे आयोजन करण्यात आले. अंधश्रद्धा, हिंसा आणि शोषणाविरोधात जनजागृती करण्याबरोबरच विवेकवादी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापासून सकाळी सात वाजता या मॉर्निंग वॉकला सुरुवात झाली. कार्यकर्ते तसेच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत डॉ. दाभोलकर यांच्या विचारांना अभिवादन केले. मॉर्निंग वॉकदरम्यान त्यांची हत्या झाल्याने त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित निर्भय 'निर्भय मॉर्निंग वॉक'मधून हिंसक प्रवृत्तींचा निषेधही करण्यात आला.

---

**मजुरीच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ | विविध भात वाणांची लागवड**

# मुरुड तालुक्यात भात लावणी पूर्ण

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

यंदाच्या खरीप हंगामात मुरुड तालुक्यात भात लावणीचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. तालुक्यात यंदा सुमारे २,०१० मिमी समाधानकारक पाऊस झाल्याने भात लागवडीस पोषक वातावरण निर्माण झाले. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने काही शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागला.

यंदा अनेक शेतकऱ्यांची धूळ पेरणी पावसाअभावी वाया गेल्याने त्यांना 'रोहू' पद्धतीचा वापर करून भाताची रोपे तयार करावी लागली. धूळ पेरणीची रोपे थेट जमिनीत उगवत असल्याने त्यांचे आवण अधिक जोमदार असते, तर रोहू पद्धतीने तयार केलेले आवण तितकेसे परिणामकारक नसल्याचे शेतकरी दिनेश मिणमिणे यांनी सांगितले होते.

मुरुड तालुक्यात खरीप हंगामातील भात पीक हे प्रमुख पीक असून. भात पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. यामध्ये सुवर्णा, जया, रुपाली, चिंटू, वाडा कोलम, रत्ना, शुभांगी, कर्जत, खारपाट्टा तसेच पनवेल आदी विविध भात वाणांची लागवड



करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही भात लावणीच्या काळात मजुरांची टंचाई जाणवत असून, मजुरीचे दरही वाढले आहेत. नांगरणीसाठी सुमारे १ हजार रुपये, पुरुष मजुरांना ६०० रुपये, तर महिला मजुरांना ३०० ते ४०० रुपये रोजंदारी द्यावी लागत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. खरीप हंगामातील भात हे तालुक्यातील प्रमुख पीक असल्याने लावणीच्या काळात महिला व पुरुष मजूर मोठ्या प्रमाणावर शेतात राबताना दिसून आले.

कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना सुधारित भात लागवड तंत्रज्ञान, संतुलित खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, कीड व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन तसेच नैसर्गिक शेतीबाबत नियमित मार्गदर्शन केले जात आहे.

समाधानकारक पाऊस, पूर्ण झालेली भात लागवड आणि शेतकऱ्यांची मेहनत यामुळे यंदा मुरुड तालुक्यात भाताचे चांगले उत्पादन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **कृषी विभागाचा सल्ला**
> शेतकऱ्यांनी शेतात आवश्यक तेवढाच पाण्याचा साठा ठेवावा, पिकांची नियमित पाहणी करावी आणि कीड किंवा रोगांची लक्षणे आढळल्यास तातडीने कृषी विभागाशी संपर्क साधावा. शिफारशीनुसार खतांचा वापर करावा, अनावश्यक रासायनिक फवारण्या टाळाव्यात आणि हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन कृषी कामांचे नियोजन करावे.

---

# निवडक

## शाळकरी मुलींना सायकल भेट



**नेरळ :** कर्जत तालुक्यातील चिंचवली बेणगाव दहिवली कोंदिवडे या राज्यमार्ग रस्त्यावरील कोंदिवडे खांडपे रस्त्यावरील खड्डे शाळकरी मुलींनी व्हिडीओ बनवून जगासमोर आणले होते. खड्डेमय रस्त्याची व्यथा छत्रीचा माईक करून पत्रकाराच्या शैलीत मांडणाऱ्या कोंदिवडे-खांडपे येथील शाळकरी मुलींचा व्हिडिओ महाराष्ट्रासह दिल्लीपर्यंत प्रचंड व्हायरल झाला होता. गेल्या चार-पाच दिवसांपासून विविध माध्यमांमध्ये या मुलींच्या व्हिडिओची चर्चा सुरू होती. या व्हायरल व्हिडिओची दखल घेत आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील युवासेनेच्या टीमला संबंधित गावात पाठवले. तसेच त्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे मुलींशी संवाद साधून त्यांना सायकल भेट देण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करत बुधवारी सायंकाळी उपजिल्हाप्रमुख नितिन सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना कर्जत तालुका पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्या तिन्ही मुलींना सायकल भेट देण्यात आल्या. सायकल मिळाल्यानंतर मुलींनी आनंदाने सायकल सवारी करत आनंद व्यक्त केला. यावेळी नेहा घारे हिने आदित्य ठाकरे आणि उपस्थितांचे आभार मानले. यावेळी कल्पेश खडे, पंकज म्हसे, अक्षय चव्हाण, समीर पेठे, राहुल भाटकर, साहिल मगर, परशुराम लोभो, योगेश थोरवे, प्रमोद सावंत आदी उपस्थित होते.

## अरविंद रणदिवे यांचे निधन

**कोलाड :** कोलाड येथील निवृत्त प्राथमिक शिक्षक अरविंद कृष्णाजी रणदिवे ऊर्फ बापू रणदिवे यांचे शुक्रवारी (दि.१४) ऑगस्ट रोजी निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ७७ वर्षाचे होते.



त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अरविंद रणदिवे हे विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून सर्वांना परिचित होते. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात रणदिवे-नाईककर आप्तेष्ट व मित्र परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता तर उत्तरकार्य (तेरावे ) विधी बुधवार दि. २६ ऑगस्ट कोलाड येथील वरदायिनी सोसायटी, कोलाड हायस्कूलसमोर होणार आहे असल्याचे त्यांच्या नातेवाईकांनी सांगितले आहे.

## उरण शहरात घोड्याची दहशत

**उरण :** शहरात गेल्या अनेक दिवसांपासून एक घोडा अक्षरशः मोकाट सुटला असून, शहरातील विविध भागांत बिनधास्तपणे फिरत आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये या घोड्याची दहशत निर्माण झाली असून, विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मात्र, नागरिकांच्या सुरक्षेचा हा प्रश्न नगरपालिका प्रशासनाच्या दृष्टीने अद्याप किरकोळच असल्याचे दिसून येत आहे. या मोकाट घोड्याबाबत काही प्रतिष्ठित नागरिकांनी नगरपालिका प्रशासन तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना माहिती देऊन त्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी केली. मात्र, तक्रारी करूनही प्रशासनाच्या हालचालींना अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. नागरिकांनी तक्रार करायची, प्रशासनाने ती ऐकायची आणि त्यानंतर फाईल कुठेतरी धूळ खात पडायची, अशीच अवस्था उरणमध्ये निर्माण झाली आहे. शहरातील रस्त्यांवर, वर्दळीच्या ठिकाणी आणि नागरिकांच्या आसपास हा घोडा फिरत असल्याने एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. घोडा अचानक रस्त्यावर आल्यास दुचाकीस्वाराचा अपघात होऊ शकतो. एखाद्या लहान मुलाच्या किंवा ज्येष्ठ नागरिकाच्या अंगावर घोडा धावून गेल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. मग त्या दुर्घटनेनंतर प्रशासन जागे होणार का? आणि त्यावेळी जबाबदारी कोणाची निश्चित केली जाणार? असा सवाल संतप्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## हमरापूर प्राथमिक शाळेला संगणक भेट

**हमरापूर :** पेण तालुक्यातील हमरापुर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला एल.अँण्ड.टी. कंपनीतर्फे चार संगणक भेट देण्यात आले. पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील यांच्या हस्ते ते शाळेकडे सोपवण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत एल अँण्ड. टी कंपनीच्या शेष फंडातून सदर कॉम्प्युटर देण्यात आले आहेत. या कार्यक्रमास पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, हमरापुर



ग्रामपंचायत सरपंच राकेश दाभाडे, उपसरपंच सायली मांडलेकर, केंद्रप्रमुख प्रमोद पाटील, शिक्षण समितीचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य युवराज म्हात्रे, संदेश कदम, सर्व सदस्य तसेच एल अँण्ड. टी कंपनीचे प्रोजेक्ट लीडर संदीप कौल, प्रोजेक्ट मॅनेजर सत्यजित पत्रा, एडमिन हेड लाल अनुराग, दीपक के., मिलन घोष, शाळेचे मुख्याध्यापक विठोबा पाटील, शिक्षिका मंदाकिनी म्हात्रे सुनंदा खाडे यांच्यासह ग्रामस्थ व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२
- मेडिकल एजन्सी पिंपळभाट येथे(तत्काळ) कामासाठी मुले व मुलीसाठी ४ जागा खाली आहेत. शिक्षण १० ते १२ च्या पुढे, अलिबागच्या आजूबाजूच्या ६-८ कि.मी.परिसरातील स्टाफ हवेत. मो. ९६२३३६६७७८
- मराठी टायपिंगकरिता मुले व मुली पाहिजेत. संपर्क- ९८५०९१३९११
- चौल-अलिबागमध्ये कॉटेज व वाडी २४ तास सांभाळण्यासाठी अनुभवी जोडपे/मुल/मुली पाहिजेत. जेवण करता येण अनिवार्य. संपर्क- ९८२००२९४५८.
- pharmacist पाहिजे न्यू सिद्धांत मेडिकल अलिबाग -९९११२११७०७९
- चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डीड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क - ८९८०६९२३४/९८०८५९१२३४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## वाहन हस्तांतरण नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

बजाज ऑटो लि. कंपनीची तीन चाकी रिक्षा, जिचा वाहन क्रमांक MH 46 AZ 4598 असा आहे. तसेच रॉयल इन्फील्ट कंपनीची क्लासीक ३५० दुचाकी, जिचा वाहन क्रमांक MH 46 AQ 9495 असा आहे. तसेच होंडा कंपनीची ॲक्टीवा दुचाकी, जिचा वाहन क्रमांक MH 46 AY 7579 असा आहे. सदरची वर नमुद केलेली तिन्ही वाहने ईश्वर पांडुरंग राऊत यांचे नावे आहेत व तशी नोंद प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे आहे.

ईश्वर पांडुरंग राऊत यांचे दिनांक १३/०१/२०२६ रोजी निधन झाले आहे. मी, श्रीमती सुनयना ईश्वर राऊत वय सु. ३७ वर्षे पत्ता. सावरगाव, पोस्ट किरवली, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१ उपरोलिखित वाहनांच्या कब्जाची उत्तराधिकारी असल्यामुळे सदर वाहनांचा वापर करण्याचा माझा इरादा आहे, आणि त्यानुसार सदरची वाहने माझ्या नावावर हस्तांतर होण्यासाठी मी योग्य प्राधिकरणाकडे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

सदर बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तिने हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल रायगड यांच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. पंधरा दिवसांच्या मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०८/२०२६

उत्तराधिकाऱ्याचे नाव
**श्रीमती सुनयना ईश्वर राऊत**
पत्ता. सावरगाव, पोस्ट किरवली,
ता. कर्जत, जि. रायगड-४१०२०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) रमाकांत कृष्णा म्हात्रे, २) श्रीकांत कृष्णा म्हात्रे, ३) आशा अशोक म्हात्रे, ४) अल्पेश अशोक म्हात्रे, ५) आकांक्षा उत्तम नागांवकर, ६) विजया काशिनाथ पाटील, ७) अस्मिता अरुण मोकल, ८) सुलभा दर्शन म्हात्रे व ९) अनिता दिलीप पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| हाशिवरे | ३/१/अ | ०-३३-१० | ४.३७ |
| | | पो.ख. ०-०१-८० | |
| | | ०-३४-९० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २१/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | २७५/२ | जिरायत ६.७६.०० | २.३२ |
| | | पो.ख.०.९०.०० | |
| | | एकूण क्षेत्र ७.६६.०० | |

वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी जमिन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील असलेल्या ३.६६.०० हे.आर.चौ.मी. या शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्रापैकी १.००.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र ( १००.०० गुंठे) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील क्षेत्रापैकी १.००.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हिस्सा हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीपैकी वरील नमुद केलेल्या क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक २१/०८/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | २७५/२ | जिरायत ६.७६.०० | २.३२ |
| | | पो.ख.०.९०.०० | |
| | | एकूण क्षेत्र ७.६६.०० | |

वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी जमिन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील असलेल्या ३.६६.०० हे.आर.चौ.मी. या शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्रापैकी १.२०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (१२०.०० गुंठे) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी जमीन मालक यांच्या मालकी हक्क व तावेकब्जातील क्षेत्रापैकी १.२०.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हिस्सा हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीपैकी वरील नमुद केलेल्या क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक २१/०८/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री.जयंत घ.वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यांत येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. चंद्रकांत नारायण डागा २) सुरेश नारायण पिंपरे, ३) संध्या प्रशांत पत्रिके ४) नितीन रमेश पिंपरे ५) शालन रमेश पिंपरे, ६) सतिश रमेश पिंपरे यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून सदर जागेत कोणालाही बांधकाम करण्याची परवानगी दिलेली नाही. मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | सर्व्हे/हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | २४/४/क | ०-०५-२० | ०.०४ |
| | | पो.ख. ०-०२-०० | |
| | | ०-०७-२० | |
| २ | २४/४/ब | ०-०१-८० | ०.०१ |
| ३ | २४/६/क | ०-०२-०० | ०.०२ |
| ४ | २४/६/ब | ०-००-२० | ०.०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षीस, वारस हक्क, पोटगी, लिजचार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण: कर्जत
दिनांक : २१/०८/२०२६

सही/-
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
**ॲड. संजिवनी संजय घुमरे**
पत्ता :-जनता विद्या मंदिर, पाटीलआळी,
दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९७६३३९९१३४

# जाहिर सूचना

आमच्या पक्षकारांच्या निर्देशानुसार याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, आम्ही खालील मालकांच्या (यापुढे परिभाषित) जमिनींवरील (यापुढे परिभाषित) मालकी हक्कांची चौकशी करत आहोत, जसे की आमचे पक्षकार या जमिन मालकांकडून (यापुढे परिभाषित) कोणत्याही आणि सर्व बोजा व दाव्यांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह खरेदी करत आहेत : **(१)** खाता क्र. ५८६ ( प्लॉट क्र. ८) क्षेत्रफळ ०-३३-१२ हेक्टर, जे खातेदारांच्या संयुक्त नावे आहे, म्हणजेच (अ) श्री. दिनेश विनायक म्हात्रे (ब) श्री. गणेश विनायक म्हात्रे (**"जमीन क्र. १"**), **(२)** खाता क्र. ५८७ ( प्लॉट क्र. ९) क्षेत्रफळ ०-३३ १२ हेक्टर खातेदार, श्री. रामचंद्र कमलाकर पाटील (**"जमीन क्र. २"**) यांच्या नावाने **(३)** खाता क्र. ५८८ ( प्लॉट क्र. ७) क्षेत्रफळ ०-४४-१६ हेक्टर खतेदारांच्या संयुक्त नावाने म्हणजेच (अ) श्री मिलिंद नारायण म्हात्रे (ब) श्री मकरंद नारायण म्हात्रे (क) श्री प्रल्हाद सखाराम म्हात्रे (ड) श्री गुरुनाथ सखाराम म्हात्रे (**"जमीन क्र.३"**), **(४)** खाता क्र. ५८९ ( प्लॉट क्र. ४), क्षेत्रफळ ०-२९-४४ हेक्टर जे खातेदारांच्या संयुक्त नावाने म्हणजेच (अ) श्री. रवींद्र एकनाथ म्हात्रे (ब) श्री. सुधीर एकनाथ म्हात्रे (३) श्री. विवेक एकनाथ म्हात्रे ( **"जमीन क्र. ४"**) **(५)** खाता क्र. ५९० ( प्लॉट क्र. ५) क्षेत्रफळ ०-२९-४४ हेक्टर, खातेदारांच्या संयुक्त नावाने म्हणजेच (अ) श्री. विजय शांताराम म्हात्रे (ब) श्री. दीपक देवेंद्र म्हात्रे (**"जमीन क्र. ५"**), **(६)** खाता क्र. ५९१ ( प्लॉट क्र. २) क्षेत्रफळ ०-२९-४४ हेक्टर, खातेदार श्री. जनार्दन नथुराम म्हात्रे यांच्या नावाने (**"जमीन क्र. ६"**) **(७)** खाता क्र. ५९२ (प्लॉट क्र. ३) क्षेत्रफळ ०-२९-४४ हेक्टर, खातेदार श्री सुनील नथुराम म्हात्रे यांच्या नावाने (**"जमीन क्र. ७"**) **(८)** खाता नं. ५९३ (प्लॉट क्र. १) क्षेत्रफळ ०-५८-८९ हेक्टर खातेदारांच्या संयुक्त नावाने, म्हणजेच (अ) श्री. वसंत बालकृष्ण म्हात्रे (ब) श्री. जयप्रकाश बालकृष्ण म्हात्रे (क) श्रीमती. सुजाता अरुण म्हात्रे (**"जमीन क्र. ८"**), **(९)** खाता क्र. ५९५ (प्लॉट क्र. ६), क्षेत्रफळ ०-४४-१६ हेक्टर, जे खातेदारांच्या संयुक्त नावे, म्हणजेच (अ) श्री. हरिदास तुकाराम म्हात्रे (ब) श्री. शिवदास तुकाराम म्हात्रे (**"जमीन क्र. ९"**) (उपरोक्त खातेदारांना यापुढे एकत्रितपणे "**मालक**" म्हणून संबोधले जाईल).

जमीन क्र. १, जमीन क्र. २, जमीन क्र. ३, जमीन क्र. ४, जमीन क्र. ५, जमीन क्र. ६, जमीन क्र. ७, जमीन क्र. ८ आणि जमीन क्र. ९ (यापुढे एकत्रितपणे "**जमिनी**" म्हणून संबोधले जाईल) यांचे अधिक तपशीलवार वर्णन खालील **अनुसूची**मध्ये दिलेले आहे.

उक्त जमिनी किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधात, किंवा उक्त जमिनींसंबंधीच्या कोणत्याही गहाळ झालेल्या / हरवलेल्या मालकी हक्कांच्या दस्तऐवजासह कोणत्याही मालकी हक्कांच्या कागदपत्रांच्या संबंधात, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, अभिहस्तांकन, गहाण, बोजा, देणगी, विश्वस्त संस्था, करार, स्मारक, वारसा, दावा, ताबा, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, देखभाल, सुखाधिकार, मृत्युपत्र, वसीयत, बोजा, कौटुंबिक व्यवस्था/ तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार / समझौते, विकास हक्क, एफएसआय वापर किंवा इतर कोणत्याही प्रकारे, कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी हक्क, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा किंवा मागणी असलेल्या सर्व व्यक्ती / संस्थांना, ज्यामध्ये इतरांबरोबरच कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांचा समावेश आहे, याद्वारे विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी कागदोपत्री पुराव्यांच्या नोटरीद्वारे प्रमाणित सत्य प्रतींसह, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत, निम्नस्वाक्षरीकार अधिकाऱ्याच्या कार्यालयात लेखी स्वरूपात कळवावी; अन्यथा, असा कोणताही हक्क, मालकी हक्क, लाभ, हितसंबंध, हिस्सा, दावा आणि/किंवा मागणी, जर असेल तर, सोडून देण्यात आली आहे आणि/किंवा त्याग केले आहे असे मानले जाईल आणि असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे मानले जाईल.

**अनुसूची**
**("जमिनी ")**

**पहिले (जमिन क्र. १ ) :**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० एच. आर. क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५८६ (प्लॉट क्र. ८)** असलेला, रु. ०.३८ मूल्यांकनाचा ०-३३-१२ एच. आर. क्षेत्रफळाचा मालकी हक्काच्या शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका- अलिबाग, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र, आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : वनजमीन; दक्षिणेला: गट क्र. १९३ मधील सार्वजनिक रस्ता;
पूर्वेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८८ आणि ५९५;
पश्चिमेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८७.

**दुसरे (जमीन क्र. २) :**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० एच. आर. क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५८७ (प्लॉट क्र. ९)** असलेला, रु. ०.३८ मूल्यांकनाचा ०.३३-१२ हे. क्षेत्रफळाचा मालकी हक्काचा शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका- अलिबाग, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र, आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे:
उत्तरेला: वनजमीन; दक्षिणेला: गट क्र. १९३ मधील सार्वजनिक रस्ता;
पूर्वेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८६; पश्चिमेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ६०१.

**तिसरे (जमीन क्र. ३ ) :**
गट क्र. १९३ मधील रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या मोठ्या जमिनीपैकी **खाता क्र. ५८८ (प्लॉट क्र. ७)** अंतर्गत येणारा रु. ०.५१ मूल्यांकन असलेला ०-४४-१६ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काचा शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : वनजमीन; दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९५
पूर्वेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८९; पश्चिमेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८६.

**चौथे (जमीन क्र. ४ ) :**
गट क्र. १९३ मधील रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या मोठ्या जमिनीपैकी **खाता क्र. ५८९ ( प्लॉट क्र. ४)** अंतर्गत येणारा रु. ०.३४ मुल्यांकन असलेला ०-२९-४४ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काचा शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : गट क्र. १९१ ( भाग ); दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९०;
पूर्वेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९२; पश्चिमेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८८.

**पाचवे (जमीन क्र. ५ ) :**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या क्षेत्रफळ ८-३५-०० हेक्टर मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५९० ( प्लॉट क्र. ५)** असलेला, रु. ०.३४ मूल्यांकन असलेला, ०-२९-४४ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काचा शेतजमिनीचा भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८९; दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील सामायिक रस्ता;
पूर्वेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९१; पश्चिमेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९५.

**सहावे (जमीन क्र. ६) :**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या क्षेत्रफळ ८- ३५-०० हेक्टर क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५९१ (प्लॉट क्र. २)** असलेला, रु.०.३४ मूल्यांकन असलेला, ०-२९-४४ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काचा शेतजमिनीचा भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९२; दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील सामायिक रस्ता;
पूर्वेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९३; पश्चिमेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९०;

**सातवे (जमीन क्र. ७):**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० हेक्टर क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५९२ (प्लॉट क्र. ३)** असलेला, रु. ०.३४ मूल्यांकन असलेला, ०-२९-४४ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काच्या शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला: गट क्र. १९१ (भाग); दक्षिणेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९१;
पूर्वेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९३ ; पश्चिमेला: गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८९;

**आठवे (जमीन क्र. ८):**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८-३५-०० हेक्टर क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५९३ (प्लॉट क्र. १)** असलेला, रु. ०.६८ मूल्यांकन असलेला, ०-५८-८९ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काच्या शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : गट क्र. १९१ (भाग); दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील सामायिक रस्ता;
पूर्वेला : गट क्र. १६५ ; पश्चिमेला: गट क्रमांक १९३ मधील खाता क्र. ५९१ आणि खाता क्र. ५९२.

**नववे (जमीन क्र. ९) :**
गट क्र. १९३ मधील, रु. ९.६३ मूल्यांकन असलेल्या ८- ३५-०० हेक्टर क्षेत्रफळाच्या मोठ्या जमिनीपैकी, **खाता क्र. ५९५ ( प्लॉट क्र. ६)** असलेला, रु. ०.५१ मूल्यांकन असलेला, ०-४४-१६ हेक्टर क्षेत्रफळाचा मालकी हक्काच्या शेतजमिनीचा संपूर्ण भाग आणि विभाग, गाव वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे :
उत्तरेला : गट क्र. १९३ मधील खाता क्रमांक ५८८;
दक्षिणेला : गट क्र. १९३ मधील सामायिक रस्ता;
पूर्वेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५९०;
पश्चिमेला : गट क्र. १९३ मधील खाता क्र. ५८६.

**दिनांक २१ ऑगस्ट, २०२६**

**सही/-**
**कु. अझीझा खत्री**
**एएके लीगल**
**ॲडव्होकेट व सॉलिसिटर्स**
सर विठ्ठलदास चेंबर्स, ५०७-५०९, पाचवा मजला,
१६, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१.
ईमेल : aziza@aaklegal.in

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे -बेलवडे बुद्रुक, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यास सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवडे बुद्रुक | २७५/२ | जिरायत ६.७६.०० | २.३२ |
| | | पो.ख.०.९०.०० | |
| | | एकूण क्षेत्र ७.६६.०० | |

वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी जमिन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील असलेल्या ३.६६.०० हे.आर.चौ.मी. या शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्रापैकी ०.६६.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र (६६.०० गुंठे) या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीपैकी जमीन मालक यांच्या मालकी हक्क व तावेकब्जातील क्षेत्रापैकी ०.६६.०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णतः हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान जमीन मालक यांचा असणारा मालकी हिस्सा हा निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीमधील विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीपैकी वरील नमुद केलेल्या क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण - रायगड
दिनांक : २१/०८/२०२६

अशिलांचे वकील **ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## जाहीर सूचना

**जनतेस याद्वारे सूचना** देण्यात येते की, (i) **नविन युगराज जैन,** (ii) **कविता वसंत बोकारिया,** (iii) **राजिव माणिकलाल बोकारिया**, सर्व राहणार मुंबई, हे आमच्या अशिलांना याखाली लिहिलेल्या **अनुसूचीमध्ये** अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (**"मालमत्ता"**) विक्रीकरिता बोलणी करीत आहेत.

**मालमत्ता** आणि/किंवा तिच्या कोणत्याही भाग किंवा खंडाच्या संदर्भात संपादन, नियुक्ती, अभिहस्तांकन, जप्ती, अधिकार, निवाडा, लाभार्थी हक्क/जिंदगी किंवा इतर हितसंबंध, मृत्युपत्र, प्रभार, अभिहस्तांतरण, हुकूम, निधन, प्रवृत्ती, वहिवाट, बोजा, देवाणघेवाण, कौटुंबिक किंवा अन्य इतर व्यवस्था/समझोता/तडजोड, भेट, मंजुरी, हमी, हायपोथिकेशन, वारसा, मनाई, संयुक्त उपक्रम, भाडेपट्टी/उप-भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, *प्रलंबित कायदेशीर कारवाई*, कर्जे, देखभाल, गहाणवट (न्याय्य किंवा अन्यथा), नकारात्मक किंवा इतर करार, भोगवटा, कोणत्याही कायद्याच्या न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा लवादाद्वारे पारित आदेश, विभागणी, भागिदारी, तारण, ताबा, मुखत्यार पत्र, सर्वप्रथम खरेदी, जुनी वहिवाट, प्रतिबंध, मागणी, विक्री, प्रतिभुती हितसंबंध, हिस्सा, भाडेकरू/पोट-भाडेकरू, मृत्युविषयक संलेख, हस्तांतरण किंवा न्यास, किंवा कोणत्याही करारपत्राअंतर्गत, सहयोग किंवा करारनामा, दस्तऐवज, कोणत्याही कारणास्तव हमीपत्र किंवा लिखित या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, हिस्सा, लाभ, दावा, मागणी किंवा कोणत्याही स्वरुपाचा विवाद असणाऱ्या **कोणत्याही किंवा सर्व व्यक्तींना** याद्वारे विनंती करण्यात येते की, येथील दिनांकापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्याबाबत **objections@rjdpartners.in** येथे आणि याखाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह आम्हाला लेखी सूचित करावे, असे न केल्यास अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा किंवा दावे, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि कोणत्याही पद्धतीने बंधनकारक नसतील.

**वरील उल्लेखित अनुसूची**
(मालमत्तेचे वर्णन)

गाव ससवाणे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगडचा गट क्र. ५१७ (याआधी सर्व्हे क्र. १३५ हिस्सा क्र. २ + ४ए आणि सर्व्हे क्र. १३६ धारण केलेली) धारण केलेल्या, मोजमाप ७६.७० आर्स समतूल्य ७,६७० चौरस मीटर्स कृषिक जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः

उत्तरेस किंवा त्या दिशेने : गट क्र. ३६८/1 आणि गट क्र. ३६९;
पूर्वेस किंवा त्या दिशेने : गट क्र. ३७०, गट क्र. ५१५ आणि गट क्र. ५१६;
दक्षिणेस किंवा त्या दिशेने : रस्ता; आणि
पश्चिमेस किंवा त्या दिशेने : गट क्र. २०६ आणि गट क्र. ५१८.

**दिनांकः २१ ऑगस्ट, २०२६**

**RJD & Partners** करिता
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स
सही/-
**विनीत नालावाल्ला**
भागीदार
objections@rjdpartners.in
ओव्हल हाऊस, ४ था मजला, ब्रिटीश हॉटेल लेन, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ४००००१.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीच्या विद्यमान मालक श्री. प्रतिक विवेकानंद राणे यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र (चौ.मीटर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मुरुड, ता.मुरुड, जि. रायगड. | ४६० | १७८.२० | ०.५० |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १९/०८/२०२६.

**ॲड. प्रथमेश प्र. पोतदार**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
मोदकम हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं.७७६९०८०३३५.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनिल बबनराव जोशी यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बारशिव, ता.मुरुड, जि.रायगड. | १५६/१ | ०-१८-८० | २.०८ |
| | | एकूण ०-०१-२० | |
| | | पो.ख.०-२०-०० | |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/ तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १९/०८/२०२६

**ॲड. प्रथमेश प्र. पोतदार**
डी-१, तळमजला,
हिराबाग को. ऑप. हौ. सोसायटी,
मोदकम हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. नं.७७६९०८०३३५.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सिताबाई दयानंद म्हात्रे, २) दिनानाथ दयानंद म्हात्रे, ३) प्रमिला प्रदिप पाटील, ४) मिनाक्षी नरेश टेमकर ५) सुकन्या दयानंद म्हात्रे, ६) शर्मिला दयानंद म्हात्रे व ७) उज्वला विजय म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| हाशिवरे | १/१/अ | ०-२६-८० | ३.४४ |
| | | पो.ख.०-०१-५० | |
| | | ०-२८-३० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २१/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरसोली ग्रामपंचायत हद्दीतील मौजे वरसोली, ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक २१४८/४ एन ए.सर्व्हे नं.५० हिस्सा नं. ८३ क्षेत्र ३५८ चौ मी या मिळकतीवरील नियोजित एम.व्ही.के ऑरा मधील उचावलेल्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र २०२ चे महा.रे.रा. प्रमाणे क्षेत्र ३७.२० चौ मी व बालकनी ५.२७३ चौ.मी व कपबोर्ड ०.७२०चौ.मी व प्रिमियम टेरेस ७.८२० चौ मी एकुण क्षेत्र ५१.५३३ चौ.मी ही मिळकत ता.अलिबाग, जि.रायगड. खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकतीचे विद्यमान मालक १ श्री निलेश गंगाधर वाबळे. २.अनघा निलेश वाबळे. दोघे रा.ए/३६/५ आर सी एफ कॉलनी कुरूळ ता.अलिबाग,जि.रायगड. यांचेकडून आमचे अशिल सौ. कुमुदिनी दिनेश जोशी यांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले असून व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचा शोध घेणेकरिता व त्या मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे वरसोली, येथिल ग्रामपंचायत वरसोली मालमत्ता क्रमांक २१४८/४ एन ए. सर्व्हे नं. ५० हिस्सा नं. ८३ क्षेत्र ३५८ चौ मी या मिळकतीवरील नियोजित एम.व्ही के ऑरा मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र ४ चे महा.रे.रा. प्रमाणे क्षेत्र ३७.२० चौ मी व बालकनी ५.२७३ चौ.मी व कपबोर्ड ०.७२० चौ.मी व प्रिमियम टेरेस ७.८२० चौ मी एकुण क्षेत्र ५१.५३३ चौ.मी ही मिळकत (कारपेट) ही निवासी सदनिका.

तरी, सदर मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, पतसंस्थेच्या कर्जाचा बोजा आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीचे आत आपली हरकत त्या संबधीच्या कागदोपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांजकडे लेखी नोंदवावी.

येणे प्रमाणे विहित मुदतीत कोणाची ही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०८/२०२६

**ॲड. रसिका अमर जोशी.**
मु.नवखार,पो.सुडकोली
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हाशिवरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक १) चंद्रकांत दामोदर म्हात्रे, २) प्रेमनाथ दामोदर म्हात्रे, ३) परशुराम दामोदर म्हात्रे व ४) रामनाथ दामोदर म्हात्रे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | स. नं./हि. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| हाशिवरे | ३१६/१/ब | ०-३४-२० | ४.६९ |
| | | पो.ख. ०-०२-५० | |
| | | ०-३६-७० | |
| हाशिवरे | ३१६/२ | ०-३५-१० | ४.९३ |
| | | पो.ख. ०-०१-८० | |
| | | ०-३६-९० | |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २१/८/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/ १,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## निवडक



### सजावटीसाठी मोरपिसांची विक्री

**खांदा कॉलनी :** आगामी गोकुळाष्टमी आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये मोरपिसांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. गणेशोत्सवाच्या सजावटीसाठी मोरपिसांना विशेष मागणी असल्याने विक्रेते विविध आकारांचे पिसांचे गुच्छ विक्रीसाठी ठेवत आहेत. गणेशमूर्तीची सजावट, मखर तसेच घरातील देवघराच्या सजावटीसाठी अनेक गणेशभक्त मोरपिसांची खरेदी करतात. तसेच, गोकुळाष्टमीच्या सजावटीतही मोरपिसांचा वापर केला जात असल्याने उत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांची मागणी वाढली आहे. त्यामुळे भाजी मार्केट परिसरात विविध वस्तूंसोबत मोरपिसांचे गुच्छ ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी असल्याने त्याच्या पिसांच्या विक्रीबाबत वन्यजीव संरक्षणाच्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. कायद्यात मोराच्या शेपटीच्या पिसांबाबत स्वतंत्र तरतूद असली तरी त्यांची विक्री आणि व्यवहाराबाबत लागू नियमांची खातरजमा करणे गरजेचे आहे. त्यामुळे बाजारात विक्रीसाठी येणारी ही पिसे नेमकी कुठून आणली जातात, त्याची तपासणी करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे. उत्सवाच्या काळात सजावटीसाठी वन्यजीवांशी संबंधित वस्तूंची मागणी वाढत असल्याने प्रशासनानेही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.




### ग्रामसभांवर बहिष्कार

**रसायनी :** महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी.एन.ई. १३६ यांनी, ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर वाढता दबाव येत असल्याचा आरोप करत राज्यभर ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ग्रामसभेचे आयोजन करू नये, असे निर्देश संघटनेच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे ग्रामपंचायतीत कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी पी.एन. पाटील यांच्यावर ग्रामसभेदरम्यान दबाव वाढल्याने त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेचा महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डी.एन.ई. १३६ यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेची तातडीची बैठक घेण्यात आली. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर ग्रामसभांमध्ये कोणत्याही प्रकारचा अनुचित दबाव येऊ नये, तसेच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीरपणे हाताळला जावा, या मागणीसाठी राज्यभर ग्रामसभांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात मंत्रालयातील संबंधित विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, सभापती तसेच गटविकास अधिकारी यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. दरम्यान, खालापूर येथे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सभापती कृष्णा पारंगे आणि गटविकास अधिकारी संदीप कराड यांना निवेदन देऊन संघटनेच्या निर्णयाची माहिती दिली.



### हेदवली रस्ता तयार करण्याची मागणी

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्गावरून सावळा फाट्यापासून ते सावळे गावाकडे जाणारा रस्ता हेदवली पर्यंत खराब झाला आहे. या रस्त्याची तातडीने डागडुगी करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. कर्जत तालुक्यातील सावळे फाटा ते हदवली या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे तसेच खराब झालेल्या डांबरीकरणामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या रस्त्यावरील खड्डे तातडीने भरण्यात यावेत, तसेच रस्त्याचे डागडुजी व आवश्यक ठिकाणी डांबरीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे. या मुख्य रस्त्याच्या मागणीसाठी शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख बाजीराव दळवी यांनी कर्जत येथे बांधकाम खात्याचे उप अभियंता राहुल देवांग यांची भेट घेतली.

# टोरंट प्रकल्पासाठी प्रशासनाच्या पायघड्या

## विरोध झाल्यामुळे पर्यायी रस्त्यासाठी अधिसूचना जाहीर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथे पाली तर्फे कोतवाल खलाटी ग्रामपंचायत मध्ये प्रस्तावित असलेल्या टोरंट धरण प्रकल्पाच्या रस्त्यासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. भालिवडीपासून पाली साई डोंगर असा रस्ता बनविला जाणार आहे; मात्र, त्या रस्त्याला शेतकऱ्यांचा विरोध वाढला आहे. हे लक्षात घेऊन पाटबंधारे खात्याने हुमगाव पासून साई डोंगर पर्यंत मिसिंग लिंक बनवण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. या ८०० मीटर लांबीच्या रस्त्यासाठी जिल्हा भूसंपादन अधिकारी यांनी अधिसूचना जारी केली आहे. दरम्यान, या मिसिंग लिंक प्रकल्पासाठी हुमगाव आणि साई डोंगर येथील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत.



कर्जत तालुक्यातील हुमगाव येथील अनुसूची एकमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीवर टोरंट पावर कंपनीच्या प्रस्तावित साईडोंगर-१ कर्जत (३००० एमव्ही) उदंचन जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पाच्या उदंचन केंद्रावर जाण्यासाठी भालिवडी पासून साई डोंगर असा रस्ता प्रस्तावित आहे. मात्र, त्या ५.९१ किलोमीटर लांबीचा रस्त्यासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. या रस्त्यासाठी ३९० शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करण्याची नोटीस भूसंपादन विभागाने बजावली आहे. या प्रकल्पाला पर्यायी रस्ता म्हणून राजनाला कालवा व पाली पोटल कालवा यांच्या दरम्यान मिसिंग लिंक रस्त्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. त्यासाठी सार्वजनिक प्रयोजनाकरीता महसुल आणि वन विभागाच्या भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे.

या मिसिंग लिंक प्रकल्पासाठी ८०० मीटर लांबीचा रस्ता बनविला जाणार आहे. खासगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने कोलाड येथील पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंतांच्या नावे घेण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला आहे. तसेच, या प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी करताना जिल्हास्तरीय समिती मार्फत संबंधित जमीनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल, अशी लालुच दाखवण्यात आली आहे. दरम्यान, संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खासगी जमीन वाटाघाटीद्वारे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चीत केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे. परंतु, या नवीन रस्त्यामुळे टोरंट प्रकल्प रस्ता पुन्हा चर्चेत आला आहे.



# कर्जतमध्ये वाहतूक कोंडी मोठी समस्या




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत हे मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत असताना कर्जत शहरातील वाहतूक कोंडी मोठी समस्या बनली आहे. सुट्टीच्या दिवशी कर्जत रेल्वे पूल आणि चारफाटा या भागातील वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी एका तासापेक्षा अधिक वेळ लागतो. त्यामुळे वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या कर्जत तालुक्यातील जनतेसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष पुढे आला आहे. त्यांनी वाहतूक कोंडी बाबत आंदोलन करण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

कर्जत येथे नवीन सब अर्बन स्थानक बनत आहे, त्यानंतर नेरळ शेलू येथून एक नवीन महामार्ग तयार होत आहे, तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे कर्जत शहर भागातील रस्त्याचे जाळे महत्वाचे ठरणार आहे. कर्जत-पनवेल नवीन रेल्वे टर्मिनस सुरू झाले की चार फाटा येथील वाहतूक कोंडीचा स्फोट होणार हे निश्चित आहे. कारण सध्या चार फाटा हा कर्जतचा सर्वात मोठा बॉटलनेक होणार आहे. आता दर शनिवार आणि रविवारी या चार फाट्यावर प्रचंड वाहन कोंडी होते. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शासनाने उड्डाणपूल बांधण्याची गरज बनली आहे. त्यामुळे श्रीराम पूल येथून कर्जत चारफाटा असा चार दिशेने वाहने जाणारा उड्डाण पूल येथे आवश्यक आहे. तसेच नेरळ माथेरान, कर्जत शहर आणि मुरबाड बायपास, खोपोली अशा मार्गाने वाहतूक वळवली गेल्यास मोठा फायदा वाहनचालक यांना होऊ शकतो. त्याचबरोबर तात्पुरता उपाय म्हणून कर्ज सब अर्बन सुरू होण्याआधी चार फाटा सिग्नल यंत्रणा अधिक सक्षमपणे कार्यान्वित होण्याची गरज आहे. नो-पार्किंग झोन, आणि वन-वे नियोजन सक्तीचे करावे लागणार असून पण कायमस्वरूपी तोडगा म्हणून उड्डाणपूल बांधण्याची गरज पुढे आली आहे. तर रेल्वे पुलावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी प्रस्तावित असलेल्या नवीन पुलाला तातडीने मंजुरी देण्याची आवश्यकता आहे. या सर्व मागण्या घेऊन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आंदोलनाचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

### उड्डाणपुलांची गरज

वासरखोंडा-तमनाथ येथून रेल्वे मार्गावरून पळसदरी रस्त्याला जोडणाऱ्या उड्डाणपुलाची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनचालकांना कर्जत शहरात प्रवेश करावा लागणार नाही आणि पनवेल-खोपोलीकडे जाणारी वाहने थेट बायपास मार्गाने बाहेर जातील. मालवाडी-लाखरण नदीवरील उड्डाणपूल बांधला गेल्यास वाहतूक बाहेरून मुरबाडकडे वळवली जाऊ शकते आणि कडाव, कशेळे भागाकडे वाहने वळू शकतात. त्यातून चारफाटा भागाचा भार कमी होईल.

## पीक स्पर्धेत भाग घेण्याचे आवाहन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

कृषी विभागामार्फत 'खरीप हंगाम' अंतर्गत राज्यस्तरीय अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेची अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून, इच्छुकांनी दि.३१ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्रध्दा डुंबरे यांनी केले आहे. या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी परिसरातील कृषी साहाय्यक, कृषी पर्यवेक्षक किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## गणेशोत्सवापूर्वी रस्त्यांची दुरूस्ती करा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, कोकणात गणरायाच्या स्वागतासाठी राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने चाकरमानी आणि भाविक आपल्या गावाकडे येणार आहेत. या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांचा प्रवास सुरक्षित, वेगवान आणि सुखकर होण्यासाठी जिल्हा प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक पोलीस तसेच लोकप्रतिनिधींनी समन्वयाने तातडीने रस्ते दुरुस्ती आणि वाहतूक नियोजनाची कामे पूर्ण करावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गासह प्रमुख राज्य मार्ग आणि अंतर्गत रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे, अरुंद रस्ते, अपूर्ण कामे तसेच वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी रस्त्यांची डागडुजी आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन पूर्ण करून चाकरमानी व भाविकांना सुरक्षित आणि सुखकर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## 'जनतेसाठी लोकप्रतिनिधींकडे वेळच नाही'

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

ज्या मतदारांनी महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी सत्तेत विराजमान केले, त्याच लोकप्रतिनिधींना सद्यस्थितीत जनतेच्याप्रश्नांची उकल करण्यास साधा वेळ नसल्याने माथेरानकरांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. माथेरान शहरातील अशोक हॉटेल समोरील रस्त्यावर अंजन जातीचे झाड मुळासहित उन्मळून पडले आहे. याबाबत अनेकदा फोन करून जबाबदार लोकप्रतिनिधींना सांगण्यात आलेले असताना कुणीही ही बाब गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे ही खरोखरच खेदाची बाब असल्याचे या भागातील रहिवासी बोलत आहेत. येथील रहिवासी ॲड. विशाल रांजाणे यांनी सांगितले की, या घटनेबाबत दोन दिवसांपूर्वी संबंधित जबाबदार लोकप्रतिनिधींना झाड पडल्याचे सांगण्यात आले आहे; परंतु, त्यांच्याकडून काहीच ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. जेथे झाड पडले आहे तो येण्या-जाण्याचा प्रमुख मार्ग आहे. दोन दिवस या मार्गावरून प्रवासी घोडे सुद्धा गेलेले नाहीत. एक माणूस जाईल एवढी सुद्धा जागा उरलेली नसताना पर्यटक कसेबसे मार्ग काढून प्रवास करत आहेत. कोणाच्या घरात आजारी माणसाला ॲम्ब्युलन्सची गरज भासल्यास रुग्णाला सुविधा कशी काय उपलब्ध करून देणार, हा प्रश्न सतावत असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.



## फार्मर्स प्रोड्युसर कंपनीचे भूमिपूजन



**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आणि उमेदच्या पुढाकाराने जांभुळपाडा येथे सुधासरसगड महिला फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेडचा भूमिपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा समारंभ दि.१८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. या महिला उत्पादक कंपनीच्या माध्यमातून परिसरातील महिलांना शेती, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची जोड मिळणार असून, शेतीमालाला चांगला भाव मिळवून देणे, मूल्यवर्धित उत्पादने तयार करणे आणि स्वावलंबी होणे शक्य होणार आहे. त्यांच्या आर्थिक उन्नतीला मोठा हातभार लागणार आहे. या भूमिपूजन कार्यक्रमासाठी शर्मिला पाटील, जागृती मानकर, संदेश शेवाळे, शर्मिला बोडके, प्रणिता परदेशी, शिरीष पाटील, अभिनव पाटील, कैलास आघाव, सी.व्ही. पाटील, सी.आर.पी. ग्रामसंघाच्या महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुंभारवाड्यात रंगीबेरंगी हंड्यांची लगबग

- आकर्षक हंड्या तयार करण्याचे काम युद्धपातळीवर
- विविध रंग, साहित्यांचा वापर करून सजावट

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

गोकुळाष्टमीचा उत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून, पनवेल शहरातील कुंभारवाड्यात हंड्या बनविण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सध्या गोविंदा पथकांसाठी विविध आकारांच्या आणि आकर्षक रंगांच्या हंड्या तयार करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. माती तसेच विविध साहित्याचा वापर करून हंड्यांना आकार दिला जात आहे. त्यानंतर या हंड्यांवर आकर्षक रंगकाम आणि सजावट केली जाणार आहे. गोविंदा पथकांच्या मागणीनुसार हंड्यांचे आकार आणि सजावटीतही विविधता ठेवली जात आहे. गोकुळाष्टमीच्या दिवशी दहीहंडी फोडण्यासाठी या हंड्यांना मोठी मागणी असते. त्यामुळे मागणी लक्षात घेऊन कारागिरांनी आतापासूनच कामाला वेग दिला आहे. त्यामुळे कुंभारवाड्यात सकाळपासून रात्रीपर्यंत हंड्या तयार करण्याची लगबग सुरू आहे.



## दिघोडे जमीन प्रकरण तापले

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील दिघोडे येथील आदिवासी जमिनीच्या कथित अवैध हस्तांतरण प्रकरणाला आता मुंबई उच्च न्यायालयातही वेग आला आहे. लहू बाबू घरत यांच्या अंतरिम जामिनाच्या मागणीवर दि.५ ऑगस्ट रोजी उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला नसून, प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२५ ऑगस्ट रोजी होणार आहे. दिघोडे येथील सर्वे क्रमांक ९४/८ आणि १००/१, एकूण १.७१.०० हेक्टर जमीन आदिवासी खातेदार गोपाळ लहान्या कातकरी यांच्या नावावर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या मृत्यूनंतर वारस नोंद करताना लहू घरत व अन्य तीन सख्ख्या भावांची नावे सातबारा उताऱ्यावर कथितरीत्या बेकायदेशीर पद्धतीने दाखल करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणात घरत यांनी अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा व पनवेल सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, त्यांचा अर्ज तीन वेळा फेटाळण्यात आल्याचे सांगण्यात येते. तसेच, न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाया घातल्याच्या कारणावरून २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या आदेशाविरोधात घरत यांनी मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अपील दाखल केले. दि.५ ऑगस्ट रोजी न्यायालयासमोर हे प्रकरण आले असता अपीलकर्त्याच्यावतीने कोणीही उपस्थित नसल्याची न्यायालयीन नोंद आहे. त्यामुळे न्यायालयाने दि.२५ ऑगस्ट रोजी पुढील सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

### ग्राहकांची वर्षागणिक संख्या रोडावली | पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर परिणाम

# बाहेरून येणाऱ्या गणेशमूर्तींचा फटका

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

गेल्या कित्येक पिढ्यांपासून चिरनेर कलानगरीत गणेशमूर्ती तयार करण्याचे काम केले जात आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपल असून, सध्या येथील कारखान्यात शाडू मातीच्या मूर्ती बनविण्याच्या आणि एका बाजूला रंगकाम करण्याच्या कामाची लगबग सुरू आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चार महिने आधीच येथील मूर्तिकार गणेशमूर्ती तयार करण्याच्या कामाला सुरुवात करतात. मात्र, चिरनेर कला नगरीसह संपूर्ण उरण तालुक्यात विक्रीसाठी बाहेरून आलेल्या तयार गणेशमूर्तींमुळे येथील पिढीजात मूर्तिकारांच्या व्यवसायावर चांगलाच परिणाम झाला आहे.



उरण तालुक्यातील चिरनेर येथे अनेक पिढ्यांपासून शाडूच्या गणेश मूर्ती बनविल्या जात आहेत. अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव आल्याने तयार गणेश मूर्तींना रंगकाम करण्याचे काम अंतिम टप्प्यात येत आहे. मात्र, सध्याच्या स्पर्धात्मक आणि महागाईच्या युगात शाडूच्या गणेश मूर्तींकडे ग्राहकांची पाठ फिरत आहे. मात्र, मोठ्या प्रमाणात पिओपीच्या तयार गणेशमूर्ती आणून त्याची विक्री केली जाते. त्यामुळे आजकाल गणेश भक्तांचा कल पीओपी मूर्तींकडेच जास्त आहे. त्यामुळे शाडूच्या मूर्तींची मागणी हळूहळू कमी होत चालली आहे. परिणामी चिरनेर येथील पिढीजात कुंभार समाजाच्या मूर्तिकारांचे ग्राहक वर्षागणिक रोडावत चालले आहेत. त्यामुळे नव्या ग्राहकांबरोबर जुने ग्राहकही मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याची खंत येथील मूर्तिकार चौलकर, चिरनेरकर, हातनोलकर यांनी व्यक्त केली आहे.

> आमच्या कुंभार समाजाचा हा पिढीजात व्यवसाय असून, आता केवळ मूर्तिकला जोपासण्या पुरताच हा व्यवसाय उरला आहे. त्यात खूपच चढउतार आहेत. मात्र, या चढ-उताराची पर्वा न करता कला टिकवून ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत.
>
> – नंदकुमार चिरनेरकर, मूर्तिकार, चिरनेर

> गेल्या पाच पिढ्यांपासून आजपर्यंत आमच्या कारखान्यातच १०० टक्के शाडू मातीच्या गणेश मूर्ती घडविल्या जातात. त्यामुळे शाडूच्या गणेश मूर्ती पसंत करणारे नवे-जुने ग्राहक आमच्या कारखान्यात येऊन, दोन महिने आधीच गणेश मूर्ती बुकिंग करतात. आम्ही ग्राहकांच्या पसंतीच्या फोटो नुसार गणेश मूर्ती साकारतो. परंतु, बाहेरून येणाऱ्या गणेश मूर्तींमुळे आमच्या गणेश मूर्तींच्या मागणीत मोठी घट झाली आहे.
>
> – भाई चौलकर, मूर्तिकार, चिरनेर




## राशीभविष्य

- **मेष** : ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. महत्त्वाची बोलणी सफल होतील. आत्मविश्वास वाढीस लागेल.
- **वृषभ** : स्वकर्तृत्त्वावर अपेक्षित ध्येय गाठाल. कलाकारांचा उत्साह वाढेल. विवाहाची बोलणी सफल होतील.
- **मिथुन** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. व्यवसायात नुकसान संभवतं. शिक्षण क्षेत्रात संधींचा लाभ घ्या.
- **कर्क** : यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. उष्णतेचे विकार संभवतात. मानसिक अस्वास्थ्य राहील.
- **सिंह** : घरगुती प्रश्नांची सोडवणूक होईल. मनाजोग्या घटना घडतील. यंत्र, वाहनांचा वापर जपून करावा.
- **कन्या** : अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **तूळ** : महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. पित्ताचे विकार त्रासदायक ठरतील. मोठ्या खरेदीचा उत्साह राहील.
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावे. कौटुंबिक बाबतीत चिंता राहील. अनुभवींचा सल्ला कामी येईल.
- **धनु** : गृहसजावटीवर विशेष भर राहील. उपजत कला-गुणांना वाव मिळेल. नोकरीत सुसंधी लाभणार आहे.
- **मकर** : कार्यक्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल. आनंदी, समाधानी रहाल.
- **कुंभ** : व्यवसायात महत्त्वाचा दिलासा मिळेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल.
- **मीन** : नोकरीत प्रगतीला वाव मिळेल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. बाकी चिंता करू नका.

स्टाईल स्टेटमेंट

## कानातले निवडताना...

झुमका गिरा रे, बरेली के बाजार में... च्या ठेक्यावर थिरकणारी साधना तुम्हाला आठवत असेल. या गाण्याला अनेक वर्षं लोटली असली तरी झुमक्याचं वेड कमी झालेलं नाही. बाजारात तऱ्हेतऱ्हेचे झुमके पहायला मिळतात. छानसा, ट्रेंडी झुमका खरेदी करण्यासाठी महिलावर्गाची झुंबड उडालेली असते. सध्या तीन थरांचे बरेलीवाले झुमके लक्ष वेधून घेत आहेत. झुमका हा प्रकार कोणत्याही भारतीय पेहरावावर शोभून दिसतो. वेस्टर्नवेअरवरही तो चालून जातो. झुमक्यामुळे तुमचं रुप खुलतं. पण तीन थरांचे मोठ्ठाले झुमके प्रत्येकीला शोभून दिसत नाहीत. त्यामुळे चेहऱ्याच्या आकारानुसार झुमक्याची किंवा कानातल्यांची निवड करायला हवी. कानातल्यांच्या निवडीबाबतचं हे मार्गदर्शन...

* लांब चेहरा असणाऱ्यांनी लांबुळकी कानातली घालू नयेत. त्याऐवजी स्डट किंवा ड्रॉप इयररिंग्ज घालता येतील. स्टड किंवा ड्रॉप इयररिंग्जमुळे लांब चेहरा थोडा रुंद दिसेल आणि व्यक्तिमत्व खुलेल.

(क्रमशः)

## २१ ऑगस्ट

दिन विशेष

- **१९९३** : मंगळाच्या शोधमोहिमेतील मार्स ऑब्झर्व्हर या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.
- **२००६** : ख्यातनाम भारतीय सनईवादक उस्ताद बिस्मिला खाँ यांचा मृत्यू.
- **२०१५** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदान करणं बंधनकारक करण्याच्या गुजरात सरकारच्या निर्णयाला अहमदाबाद उच्च न्यायालयाने स्थगिती दिली.
- **२०१७** : अण्णा द्रमुकमधील दोन्ही गटांचा एकत्र येण्याचा निर्णय.

सफर देशांची

## डोंगराळ 'सॅन मरिनो'

'सॅन मरिनो' हा दक्षिण युरोपमधला एक देश आहे. सॅन मरिनो जगातला पाचव्या तर युरोपातला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात लहान आकाराचा देश आहे. हा देश चारही बाजूंनी इटलीने वेढलेला आहे. 'सिटी ऑफ सॅन मरिनो'ही या देशाची राजधानी. 'सॅन मरिनो' ही जगातली सर्वात जुनी लोकशाही असल्याचं म्हटलं जातं. 'सॅन मरिनो' हा स्वतंत्र देश असला तरी तो मोठ्या प्रमाणावर इटलीवर अवलंबून आहे. पर्यटन हा इथला सर्वात मोठा उद्योग आहे. गंमत म्हणजे पोस्टाचे जुने स्टँप विकण्याचा व्यवसायही बरेच लोक करतात. हा इथल्या लोकांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. युरो हेच सॅन मरिनोचं चलन आहे. या देशातले लोक इटालियन भाषा बोलतात. ॲपेनाइन पर्वतरांगा हे या देशाचं ठळक वैशिष्ट्य. सॅन मरिनोचा बराचसा भाग डोंगराळ आहे. 'माँटे टिटॅनो' हे इथलं सर्वात उंच शिखर आहे. सॅन मरिनोमध्ये विविध प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. इथे शेतीही केली जाते. गहू, द्राक्षं, मका, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात. काही लोक पशुपालनाचा व्यवसायही करतात. १९९२ मध्ये हा देश संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. या देशात कुटुंबव्यवस्था अस्तित्वात आहे.

### पंचांग

**शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, श्रावण शु. ९, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : वंधृति, सूर्योदय ६.२३, सूर्यास्त ७.००

### फॉरवर्ड्स

**ए आसमां तेरे ख़ुदा क़ा नहीं हैं खौफ़...**

**ड़रते हैं ए जमींन तेरे आदमीं सें हम...!**

आरोग्यमंत्र

## किरणोपचार म्हणजे काय?



अनेक पदार्थ किरणोत्सर्गी असतात. यात नैसर्गिक व कृत्रिम पदार्थांचा समावेश होतो. क्ष-किरण, गॅमा किरण, अल्फा, बीटा व प्रोटॉन असे अनेक किरणोत्सर्ग आपल्याला ज्ञात आहेत. अणुबॉम्बसारख्या विध्वंसक अस्त्रामुळे होणाऱ्या दुष्परिणामांमध्ये किरणोत्सर्गाचे दुष्परिणाम खूप महत्त्वाचे असतात. किरणोत्सर्गाच्या प्रभावामुळे रक्ताचा कर्करोग इतर इंद्रियांचे कर्करोग तसेच आयुष्यमान कमी होणे हे तीन महत्त्वाचे दुष्परिणाम होतात. उपरोक्त किरणोत्सर्गांपैकी क्ष-किरण व गॅमा किरण हे शरीरात खोलवर जाऊ शकतात.

क्ष-किरणांच्या शरीरातून आरपार जाऊ शकणाऱ्या गुणधर्माचा वापर क्ष-किरण फोटो काढण्यासाठी करतात. हाडे, स्नायू, हवा यांच्या वेगवेगळ्या घनतेमुळे कमी अधिक प्रमाणात क्ष-किरण त्यातून आरपार जाऊ शकतात व क्ष-किरण प्लेटवर पडतात. याचे दृश्य स्वरूप म्हणजे क्ष-किरण फोटो होय. किरणोत्सर्गी आयोडीनचा वापर थायरॉईड ग्रंथीचे कार्य व्यवस्थित चालू आहे वा नाही हे बघण्यासाठी होतो. गॅमा किरणांमुळे शरीरातील पेशी मरतात. या गुणधर्माचा वापर किरणोपचारात केला जातो.

एका यंत्राच्या सहाय्याने किरणोत्सर्गी कोबाल्ट धातूपासून निघणारे किरण विशेष नियंत्रणाखाली कर्करोग झालेल्या इंद्रियावर सोडले जातात. हा उपचार गरजेनुसार अनेक वेळा केला जातो. किरणोत्सर्गामुळे कर्करोगाच्या पेशी मरतात. सामान्यत: शस्त्रक्रियेने अथवा औषधी चिकित्सेने कर्करोग बरा होण्यासारखा नसल्यास किरणोपचाराचा वापर करतात. अशा प्रकारे किरणोपचाराने हजारो कर्करोगग्रस्त रुग्णांचे आयुष्य वाढवता येते.

### फॅशन पॅशन

दोस्तांनो, मान्सूनमध्ये स्टायलिंगची थोडी जास्तच काळजी घ्यावी लागते. अर्थात या दिवसातही मस्त ट्रेंडी दिसता येतं. यासाठी काय करता येईल, याविषयी...

* मान्सूनमध्ये कंफर्टला सर्वात जास्त महत्त्व द्यायला हवं. या दिवसात शक्य तितके कॅज्युअल रहा. ग्राफिक्स, पॅटर्न्स, स्लोगनवाले टी शर्टस कॅरी करायला हरकत नाही. त्यावर रग्ड जीन्स घाला आणि पावसात मनसोक्त फिरा.

(क्रमशः)

करिअरवाटा

## लोकसंख्याशास्त्रात घडवा कारकिर्द



लोकसंख्यावाढीचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. अशा परिस्थितीत लोकसंख्या शास्त्रात कारकिर्द घडवणं उपयुक्त ठरू शकेल. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमुळे लोकसंख्येला प्रभावित करणारे घटक लोकसंख्याशास्त्रात पद्धतशीरपणे अभ्यासले जातात. साहजिकच जनगणना तसेच सर्वेक्षण कार्यालये, सार्वजनिक आरोग्य विभाग, समाजकल्याण विभाग, नियोजन विभाग अशा राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक प्रशासकीय यंत्रणेत थेट नोकरी वा सल्लागार म्हणून लोकसंख्याशास्त्रज्ञांना कारकीर्दीच्या संधी उपलब्ध आहेत. शासकीय यंत्रणा व शैक्षणिक क्षेत्राशिवाय पणन (मार्केटिंग) व जाहिरात क्षेत्र, जीवविज्ञान क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि विविध संशोधन संस्था यांना लोकसंख्याशास्त्रातील प्रशिक्षित व्यक्तींची गरज असते. उदाहरणार्थ, पॉप्युलेशन फाउंडेशन ऑफ इंडिया, नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च, जागतिक बँक, संयुक्त राष्ट्रसंघाच्या युनिसेफ व अन्य संस्था यांत नोकरी किंवा प्रकल्पांसाठी लोकसंख्याशास्त्रज्ञांना पाचारण केले जाते.ङ्गङ्गमुंबईतील 'आंतरराष्ट्रीय लोकसंख्याविज्ञान संस्था' (इंटरनॅशनल इन्स्टिटयूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेस) हे अभिमत विद्यापीठ लोकसंख्याशास्त्राचे शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन यासाठी अग्रगण्य आहे.

खेचाखेची

## होम लोन

सगळ्या बँका भाड्याच्या जागेत आपला व्यवसाय करतात,

आणि...

लोकांना फोन करून विचारतात, होम लोन हवं आहे का?

वेगळं काही

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमध्ये एडवर्ड मोरड्रेक नावाचा एक माणूस होऊन गेला. या माणसाला दोन तोंडं होती. एक तोंड पुढच्या बाजूला तर दुसरं तोंड मागच्या बाजूला होतं. त्याचा दुसरा चेहरा सक्रीय नसायचा. पण एडवर्डने रात्री झोपण्याचा प्रयत्न केल्यावर हा चेहरा जागा राहायचा. एडवर्ड आपल्या या दुसऱ्या चेहऱ्यामुळे खूप वैतागला होता. यामुळे तो अनेक महिने झोपू शकला नव्हता. एडवर्डने उपचारांसाठी डॉक्टरांच्या वाऱ्या केल्या. पण एडवर्डला उपचार करून घेता आले नाहीत. एडवर्डचा दुसरा चेहरा मुलीसारखा असल्याचंही बोललं जातं. एडवर्ड आनंदी असल्यावर या दुसऱ्या चेहऱ्याला खूप राग यायचा आणि तो रडू लागल्यावर हा चेहरा आनंदी व्हायचा.

ट्रेंडी

## क्रेझ अफगाण चोकरची

फॅशनविश्वात वेळोवेळी विविध ट्रेंड्स पहायला मिळत असतात. त्यांचा अवलंब करुन तुम्हीही 'फॅशन दिवा' अशी ओळख मिळवू शकता. कशाच काही ट्रेंड्सविषयी...



* क्रेझ अफगाण चोकर: पारंपरिक पेहरावासोबत कोणत्या पद्धतीचे दागिने घालावेत याबाबत फारशी अडचण येत नाहीत. पण वेस्टर्न आऊटफिटवर कोणती ज्वेलरी घालावी याविषयी अनेकींना संभ्रम असतो. सध्या वेस्टर्न आउटफिटवर अफगाण ज्वेलरी ट्रेंडमध्ये आहे. ऑफ शोल्डर टॉपसारख्या ड्रेसवर ही ज्वेलरी खुलून दिसते. अफगाण चोकर, इअररिंग्ज, पैंजण हे प्रकार वापरू शकता. * रेनी नेल आर्ट: पावसाची जादू फॅशनविश्वावरही बरसू लागली आहे. नभांची गडद छाया, इंद्रधनुष्य, पावसाचे थेंब हे सगळं नेल आर्टद्वारे नखांवर साकारलं जात आहे. नखांवर अम्ब्रेला पॅटर्न पेंट करून तरुणी पावसाविषयीच्या भावना व्यक्त करताना दिसत आहेत. * 'फरी' पादत्राणं: सध्या फर, स्लाईड इन, स्पा रॅप, टॅरी स्लिपर्स ट्रेंडमध्ये आहेत. वजनाला हलके आणि आरामदायी असल्याने त्यांचा वापर सुकर ठरतो.

## सुडोकू १४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | | | ६ | | | | २ | |
| | | ९ | १ | २ | | | ८ | |
| | | | ४ | | | ३ | ६ | १ |
| ६ | | | | | ४ | | ५ | |
| १ | | | | | | | | २ |
| | ७ | | ५ | | | | | ८ |
| ४ | ५ | ३ | | | २ | | | |
| | २ | | | ४ | १ | ९ | | |
| | १ | | | | ६ | | | ३ |

टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १४० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १ | ३ | २ | ७ | ९ | ४ | ५ | ६ |
| ७ | ६ | ५ | ४ | ८ | १ | ३ | २ | ९ |
| ४ | ९ | २ | ३ | ६ | ५ | १ | ७ | ८ |
| ९ | ४ | १ | ७ | ३ | ६ | २ | ८ | ५ |
| ६ | ३ | ८ | ५ | १ | २ | ७ | ९ | ४ |
| ५ | २ | ७ | ९ | ४ | ८ | ६ | १ | ३ |
| ३ | ८ | ६ | १ | ९ | ७ | ५ | ४ | २ |
| १ | ५ | ४ | ८ | २ | ३ | ९ | ६ | ७ |
| २ | ७ | ९ | ६ | ५ | ४ | ८ | ३ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १४१



**आडवे शब्द :-**

१) फौजेबरोबर असणारी अवांतर माणसे
६) गदा घेतलेला
१०) हाक, प्रतिसाद
११) अन्यायाचे, बेकायदेशीर
१३) जास्त
१४) तृष्णा
१६) तेज, कांती
१८) नम्र, वाकलेला
२०) सामुद्रीवाहन
२३) टिकून राहाणे
२४) प्रस्थान करणे
२६) कडक
२७) दीन, दुबळ्यांवर दया करणारा
२९) थंडावा
३१) दाद
३३) चंद्र
३४) जास्तीचे, गणितातील मिळविणे
३६) माणूसकी
४१) प्रेत वाहून नेताना म्हणावयाचे शब्द
४४) हिंदुस्थान
४६) शिकारीचा प्राणी
४८) श्रीमंत
५०) प्रतिष्टा, अब्रू
५१) त्या प्रकारचा
५२) थरथरणे
५४) दृढ, पक्का, कायम
५६) धैर्य, हिंमत
५८) घाबरणे
६०) संगमरवरी दगड
६२) अंगठ्या जवळचे बोट
६४) सोवळ्यातील रेशमी वस्त्र
६५) गेरू
६६) वेल
६८) मऊ
७०) येथे जाणे म्हणजे नाश पावणे, बुडणे (वा प्र)
७३) चामखीळ
७४) सारखा
७६) गणक, मोजणारा
७७) शर्करा
७८) चणचण, दुर्भिक्ष
८०) बाज विणण्याची सुती पट्टी
८२) काठोकाठ
८४) फायदा, प्राप्ती
८५) दृष्टीभेट
८६) आणि

**उभे शब्द :-**

१) निराधार बातमी, अफवा
२) पृथ्वी
३) चर्मपात्र, कुपी
४) निवासस्थान
५) नाजूक
६) गणपती
७) मोठा भाऊ
८) पद्धत
९) जन्म मृत्यू
१२) राजाची मुलगी
१५) हस्त
१७) यज्ञ
१९) नटणारा
२१) सूची
२२) मूळ आधार
२५) हिमालय
२८) प्रिय स्त्री
३०) रक्कम, ठराविक पैसे
३२) एक ग्रामदेवता
३५) एक हजार गॅम
३७) दुष्ट
३८) वांती
३९) महान, मोठा
४०) सामान्य
४२) सिनेमा
४३) हिस्सा, वाटा
४४) अवधान, चित्त
४५) बारा वर्षाचा काळ
४७) वस्ती
४९) उपयोग
५०अ) बूड
५३) पाताळ, यमराज्य
५४) पोलीसचौकी
५५) रबरी चपला
५७) ऑपरेशन करणारा डॉक्टर (इं )
५९) कदर करणारा
६०) त्रिफळातील आंबट फळ
६१) मनाला लागलेली टोच
६३) फोडणी दिलेले ताक
६६अ) दिवस
६७) आभाळ
६९) मला
७१) उंट हाकणारा
७२) संतोष, आनंद
७३) महिरप
७५) थोडक्यात महाराष्ट्र राज्य
७७) आधारासह
७९) फक्त, केवळ
८१) पराग
८३) प्रतिदिनी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# पनवेल मॅरेथॉनला एआयएमएस प्रमाणपत्र

## जागतिक स्तरावरील मॅरेथॉनसाठी पात्रता



| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

देशात आणि जगभरात होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेत धावणाऱ्या मॅरेथॉनपटूंसाठी पनवेल महापालिकेची मॅरेथॉन स्पर्धा महत्त्वाची ठरणार आहे. ऑल इंडिया ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया या शासनमान्य संस्थेची संलग्न एआयएमएस या संस्थेकडून पनवेल मॅरेथॉनला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे पनवेल मॅरेथॉन स्पर्धेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

२३ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये पहिल्यांदाच खारघर हिल महापौर मॅरेथॉन होत आहे. ४२ किलोमिटरची हिल मॅरेथॉन देशातील पहिलीच मॅरेथॉन असल्याचा दावा केला जातो आहे. लोकसहभागातून होणाऱ्या मॅरेथॉनला खेळाडूंकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. सहा हजारांपेक्षा अधिक खेळाडूंनी आजवर ऑनलाईन नोंदणी केली आहे. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत पात्र ठरण्यासाठी मॅरेथॉनचे मार्ग अधिकृत पद्धतीने मोजले जातात. एआयएमएस ही संस्था नामांकित संस्था म्हणून प्रसिध्द आहे. ऑल इंडिया ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्या अखत्यारित संस्थेने पात्रता कामगिरीच्या मान्यतेसाठी मॅरेथॉन मार्गाच्या मोजमापासंबंधी ठरावीक निकष पूर्ण करणे आवश्यक असते.

पनवेल महापालिकेने आयोजित केलेल्या मॅरेथॉनचा मार्ग एआयएमएस संस्थेकडून मान्यता मिळाल्यामुळे खारघर हिल महापौर मॅरेथॉनला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पनवेलच्या मॅरेथॉनमध्ये धावल्यास धावपटूंना संबंधित संस्थेचे प्रमाणपत्र मिळणार आहे. हे प्रमाणपत्र जगभरात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय मॅरेथॉनसाठी ग्राह्य धरले जात असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे. मुंबईत होणाऱ्या नामांकित स्पर्धेशिवाय नवी मुंबईत होणाऱ्या मॅरेथॉनमध्ये देखील एआयएमएस प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे देशातील पहिली मोठी हिल मॅरेथॉनसोबत एआयएमएस प्रमाणपत्र देणारी मॅरेथॉन म्हणून पनवेलच्या मॅरेथॉनची चर्चा देशभरातल्या स्पर्धकांमध्ये आहे. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेला महापौर नितीन पाटील, मुख्य प्रवर्तक परेश ठाकूर, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे आदींसह प्रभाग समित्यांचे सभापती उपस्थित होते.

### स्पर्धेचे शुल्क तुलनेने कमी

लोकसहभागातून होणाऱ्या मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी एआयएमएस प्रमाणपत्र असलेल्या स्पर्धेत तुलनेने अत्यंत कमी शुल्क ठेवण्यात आले आहे. एआयएमएस प्रमाणित मॅरेथॉनची तुलना केल्यास पनवेलच्या मॅरेथॉनचे शुल्क खूप कमी असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

### महापौरांकडून पाहणी

बुधवारी खारघर हिल मॅरेथॉनच्या मार्गांची पनवेल महानगर पालिकेचे महापौर नितिन पाटील यांच्यासमवेत पनवेल महानगर पालिका प्रशासनाने पहाणी केली. मॅरेथॉनच्या निमित्ताने पनवेलचे नाव देशभरातील खेळाडूंपर्यंत पोहोचणार असल्यामुळे सुरक्षिततेची काळजी घेण्याच्या सुचना पालिका प्रशासनाला पाटील यांनी दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त १ गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनो, परदेशी अभ्यासदौऱ्यात सहभागी व्हा!

## पोलादपूर तालुका कृषी अधिकारी यांचे आवाहन

| पोलादपूर | प्रतिनिधी |

आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती घेऊन त्याचा आपल्या शेतीत उपयोग करण्याची संधी शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी कृषी विभागाकडून परदेशी अभ्यासदौरा आयोजित करण्यात येणार आहे. या अभ्यासदौऱ्यासाठी इच्छुक व पात्र शेतकऱ्यांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.

परदेशातील आधुनिक कृषी तंत्रज्ञान, तेथील शेतकऱ्यांकडून होणारा वापर आणि त्यातून वाढलेले उत्पन्न याचा प्रत्यक्ष अभ्यास या दौऱ्यात करता येणार आहे. तसेच शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी, कृषी संस्था आणि विविध क्षेत्रांना भेटी देऊन शेतकऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्याचा उद्देश आहे.

जिल्ह्यातून एक महिला शेतकरी, राज्य किंवा केंद्रस्तरीय कृषी पुरस्कारप्राप्त अथवा पीक स्पर्धेतील विजेते दोन शेतकरी आणि इतर तीन शेतकरी, अशा एकूण पाच शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. अर्जदार स्वतः शेतकरी असावा व त्याच्याकडे अग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक असणे आवश्यक आहे. शेती हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्याचे स्वयंघोषणापत्रात नमूद करावे. एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जासोबत शिधापत्रिका व आधारकार्डाची प्रत जोडावी.

अभ्यासदौऱ्याच्या दिवशी शेतकऱ्याचे वय किमान २५ वर्षे पूर्ण असावे. शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचे एमबीबीएस डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र तसेच आवश्यक आरोग्य तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. अर्जदाराकडे किमान एक वर्ष वैधता असलेला पासपोर्ट असणे आवश्यक आहे. शासकीय, निमशासकीय, सहकारी किंवा खासगी संस्थेत नोकरी करणारे तसेच डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, अभियंता, कंत्राटदार आदी व्यावसायिक या योजनेसाठी पात्र नसतील. यापूर्वी शासकीय अर्थसहाय्याने परदेश दौरा केलेल्या शेतकऱ्यालाही या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

अभ्यास दौऱ्यासाठी शासनाकडून एकूण खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त दोन लाख रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची अंतिम निवड राज्यस्तरीय समितीमार्फत केली जाणार आहे. इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी येत्या चार दिवसांत परिपूर्ण अर्ज पोलादपूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केले आहे.

# तळवली येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

| खांब | प्रतिनिधी |

तालुक्यातील तळवलीतर्फे अष्टमी येथे पूर्वापार परंपरेनुसार चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन शनिवारी (दि.२२) ते शनिवारी (दि.२९) या कालावधीत करण्यात आले आहे. या सप्ताह प्रसंगी दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती व भूपाळ्या, सकाळी ८ ते ११:३० ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण, सायंकाळी प्रवचन, सामुदायिक हरिपाठ तर रात्रौ हरिकिर्तन तद्नंतर हरिजागर आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात येणार असून या सप्ताहाचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ मोलाचे सहकार्य करीत आहेत.

# माथेरानच्या हातरिक्षा चालकांचा अल्टिमेटम

## १५ ते २० दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलनाचा इशारा



| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरानमधील हातरिक्षा चालकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न वर्ष उलटूनही मार्गी न लागल्याने आता हातरिक्षा चालकांनी प्रशासनाविरोधात आरपारच्या लढ्याची तयारी सुरू केली आहे. पात्र हातरिक्षा चालकांना ई-रिक्षा देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी श्रमिक हातरिक्षा चालक-मालक संघटनेने केली आहे. येत्या १५ ते २० दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा संघटनेने प्रशासनाला दिला आहे.

माथेरानमध्ये आजही अनेक चालक हातरिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. हातरिक्षाची अमानवीय प्रथा बंद करून संबंधित चालकांचे पुनर्वसन करण्याचे आदेश असतानाही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही वर्ष उलटले तरी ई-रिक्षा मिळत नसल्याने चालकांमध्ये असंतोष वाढत आहे.

वर्षानुवर्षे हातरिक्षा चालवून उदरनिर्वाह करणाऱ्या चालकांना आता आपल्या हक्काच्या ई-रिक्षेची प्रतीक्षा करावी लागत आहे. आमच्या पुनर्वसनासाठी आणखी किती काळ संघर्ष करायचा? असा संतप्त सवाल हातरिक्षा चालकांनी उपस्थित केला आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या आश्वासनांची पूर्तता झालेली नसल्याने हातरिक्षा चालक आता आक्रमक झाले आहेत. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी महसूल अधीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच नगराध्यक्ष यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

या निवेदनावर श्रमिक हातरिक्षा चालक-मालक संघटनेच्या सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असून, हातरिक्षा क्रमांकासह चालकांनी आपल्या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे. आता प्रशासन ई-रिक्षांबाबत कोणता निर्णय घेते, पात्र हातरिक्षा चालकांचे पुनर्वसन कधी होते आणि २० दिवसांची दिलेली मुदत संपल्यानंतर आंदोलनाचे पुढील स्वरूप काय असेल, याकडे माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

## निवडक

### शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सारा वर्तकचा गौरव



**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील फोफेरी येथील युवा जलतरणपटू सारा अभिजीत वर्तक हिची बँकॉक येथे होणाऱ्या स्विमिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र ॲक्वाटिक इंडिया संघात तिची निवड झाल्याबद्दल शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन साराचा गौरव करण्यात आला. यावेळी साराचे वडील अभिजित वर्तक, शेकाप नेते अनिल पाटील, दिलीप गावंड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.सारा अभिजीत वर्तक ही भारतातील ओपन-वॉटर (खुले जलस्रोत) जलतरण क्षेत्रातील अत्यंत आश्वासक खेळाडू म्हणून उदयास येत आहे. आपल्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर तिने जलतरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यावेळी उपस्थितांनी आगामी स्पर्धेसाठी साराला शुभेच्छा दिल्या.

### प्रदीप कदम यांना मातृशोक

**म्हसळा :** म्हसळा तालुका नाभिक समाजाचे माजी अध्यक्ष प्रदीप महादेव कदम यांच्या मातोश्री मालती महादेव कदम (८५) यांचे म्हसळा येथील राहत्या घरी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी तसेच नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सर्वधर्मीय नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले आणि कदम कुटुंबीयांचे सांत्वन केले. सायंकाळी म्हसळा येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने कदम कुटुंबीय तसेच नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे.

### आशा सेविकांना साडी वाटप



**नवीन पनवेल :** झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था, नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील विविध गावांमध्ये कार्यरत असलेल्या सुमारे १२० आशा सेविका व नर्स यांच्यासाठी साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम दोन बॅचमध्ये पार पडला. आशा सेविका आणि नर्स या आपल्या समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत. गावागावात आणि घराघरात जाऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे, महिलांना व कुटुंबांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करणे आणि गरजेच्या वेळी सेवा देणे, हे कार्य त्या अत्यंत जबाबदारीने आणि सेवाभावाने करतात.या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. लिखिते यांनी आशा सेविकांना उपयुक्त आणि मार्गदर्शक प्रशिक्षण दिले. इतरांच्या आरोग्याची काळजी घेत असताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आणि वेळोवेळी स्वतःची आरोग्य तपासणी करून घेणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या प्रशिक्षणातून देण्यात आला. समाजाच्या आरोग्यासाठी सातत्याने आणि निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या या सेवाभावी महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साडी वाटपाच्या माध्यमातून हा सन्मान करण्यात आला. उपस्थित राहिलेल्या सर्व १२० आशा सेविका व नर्स त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# हृषीकेश परांडेकर सीईओपदी नियुक्त

| चिरनेर | प्रतिनिधी |

मुंबई, पुणे आणि बंगळुरू येथील बाजारपेठांमध्ये आघाडीवर असलेल्या रिअल इस्टेट कंपनी कोलते-पाटील डेव्हलपर्स लिमिटेड यांनी हृषीकेश परांडेकर यांची मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली. ही नियुक्ती कंपनीच्या विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

कंपनी विविध बाजारपेठांमध्ये विस्ताराला गती देत असून, व्यवसायाचा विस्तार, प्रभावी अंमलबजावणी आणि मूल्यनिर्मिती यावर अधिक भर देत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून हृषीकेश परांडेकर हे कंपनीच्या पुढील विकासाच्या टप्प्याचे नेतृत्व करतील. त्यामध्ये व्यवसायाचा विस्तार, कार्यात्मक उत्कृष्टता, संस्थात्मक बळकटीकरण आणि भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मिती यांचा समावेश असेल.

# नगराध्यक्षांना डावलून शिष्टमंडळ?

## मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

ऐतिहासिक पेशवे स्मारक आणि सुशोभीकरणाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना, १८ ऑगस्ट रोजी श्री लक्ष्मीनारायण मंदिरात झालेल्या देवस्थान न्यास व नगरपरिषद शिष्टमंडळाच्या बैठकीने नवा वाद निर्माण केला आहे. नगराध्यक्षांना डावलून मुख्याधिकारी, उपनगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे शिष्टमंडळ बैठकीला गेल्याने नगरपरिषदेचा कारभार नेमका कोणाच्या हातात आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

नगराध्यक्ष हे नगरपरिषदेचे प्रमुख लोकप्रतिनिधी असताना त्यांना या महत्त्वाच्या बैठकीपासून दूर का ठेवण्यात आले, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मुख्याधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबतही संशय व्यक्त होत असून, नगराध्यक्षांना डावलून उपनगराध्यक्षांना पुढे करण्यामागे नेमका उद्देश काय? अशी चर्चा शहरात रंगली आहे.

बैठकीत सुशोभीकरणाच्या नावाखाली प्रस्तावित दुकानगाळे, वाहनतळ आणि शौचालयांच्या बांधकामाबाबत देवस्थान सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर नगरपरिषदेच्या शिष्टमंडळाने 'वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय कळवू', असे उत्तर दिले.

मुख्याधिकारी आणि उपनगराध्यक्ष स्वतः बैठकीत उपस्थित असताना निर्णयासाठी ज्या 'वरिष्ठांशी' चर्चा करण्याचे सांगण्यात आले, ते वरिष्ठ नेमके कोण? असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. या भूमिकेमुळे नगरपरिषदेच्या निर्णय प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, २००३ पासून प्रलंबित असलेल्या पेशवे स्मारक आणि संबंधित जागेच्या प्रश्नावर २१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या देवस्थानच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरपरिषदेच्या भूमिकेमुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# नाईक महाविद्यालयात नशामुक्तीचा संदेश



| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य डॉ. जे.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली ड्रग्स-मुक्त रायगड जिल्हा अभियानांतर्गत वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयात कॅम्पस कनेक्ट उपक्रमांतर्गत नशा मुक्त भारत संकल्पना या जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि मुरुड जंजिरा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी व्यसनाधीनतेची कारणे, त्यातून होणारी शारीरिक व मानसिक हानी आणि याविरोधात पोलीस यंत्रणेकडून मिळणारे सहाय्य याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन करुन तरुण पिढीने अमली पदार्थांपासून दूर राहून समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले तर विद्यार्थ्यांनी सामाजिक व नैतिक जबाबदारी स्वीकारून व्यसनमुक्त व सशक्त समाज निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा, असे प्राचार्य डॉ.जे.के. कांबळे यांनी सांगितले.

# 'आरटीओतील गैरप्रकारांची चौकशी करा'



| पनवेल | प्रतिनिधी |

प्रादेशिक परिवहन विभागाच्या पनवेल-खारघर येथील कार्यालयात एडीसीसंदर्भातील कथित गैरप्रकार व भ्रष्टाचाराच्या प्रकारांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी नियोजित आंदोलनास परवानगी नाकारण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी माघार न घेता परिवहन अधिकाऱ्यांची भेट घेऊन राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष शहाबाज पटेल यांनी निवेदन सादर केले.

पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष शहाबाज पटेल यांनी परिवहन अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून संबंधित प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. तसेच नागरिकांना होणारा त्रास तातडीने थांबवावा आणि कथित गैरप्रकारांना जबाबदार असलेल्या व्यक्तींवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. आंदोलनास परवानगी नाकारण्यात आली असली तरी नागरिकांच्या प्रश्नांवर माघार घेणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. परिवहन अधिकाऱ्यांनी निवेदनाची गांभीर्याने दखल घेत सकारात्मक प्रतिसाद दिला. संबंधित तक्रारी व आरोपांची चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. परिवहन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणे आवश्यक असून, नागरिकांच्या हितासाठी हा लढा पुढेही सुरू ठेवण्यात येईल, अशी भूमिका शहाबाज पटेल यांनी व्यक्त केली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष चाँद शेख, श्रेयश भावसार, शोएब पटेल, आमिर राऊत तसेच पत्रकार उपस्थित होते.

## राष्ट्रीय कथ्थक स्पर्धेत घवघवीत यश | ३०० स्पर्धकांमधून अनुश्री द्विवेदी व शरण्या वाघमोडे प्रथम

# 'जिंदल'च्या विद्यार्थिनी चमकल्या



| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

जिंदल विद्या मंदिर, साळावच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावरील कथ्थक नृत्य स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. मीरारोड, मुंबई येथील लता मंगेशकर सभागृहात १६ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'कलांजली उत्सव' राष्ट्रीय कथक नृत्य स्पर्धेत जिंदल विद्या मंदिर, साळावच्या विद्यार्थिनींनी ३०० स्पर्धकांमधून प्रथम क्रमांकाचा मान पटकावला.

या स्पर्धेत इयत्ता सातवी-ब मधील अनुश्री अरविंद द्विवेदी आणि इयत्ता सहावी-ब मधील शरण्या संतोष वाघमोडे यांनी आपल्या उत्कृष्ट कथक नृत्याविष्काराने परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या उल्लेखनीय सादरीकरणाला प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठित स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे जिंदल विद्या मंदिर, साळावच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. अवघ्या ३०० स्पर्धकांमधून प्रथम क्रमांक मिळविण्याची कामगिरी ही दोन्ही विद्यार्थिनींच्या कलागुणांचे, आत्मविश्वासाचे आणि मेहनतीचे प्रतीक आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक, प्राचार्य मुकेश ठाकूर आणि उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी अनुश्री अरविंद द्विवेदी आणि शरण्या संतोष वाघमोडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या कलागुणांचे आणि मेहनतीचे कौतुक करत त्यांनी दोन्ही विद्यार्थिनींना भविष्यातील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून शैक्षणिक क्षेत्रासोबतच कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही सातत्याने प्रोत्साहन दिले जात असून, राष्ट्रीय स्तरावरील हे यश त्या प्रयत्नांचे फलित असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

अनुश्री द्विवेदी आणि शरण्या वाघमोडे यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जिंदल विद्या मंदिर, साळावचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले असून, त्यांचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)